रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २६४
www.ramprahar.com

◆ सोमवार, १३ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## पंतप्रधान मोदी उद्या कर्तृत्ववान महिलांशी साधणार संवाद

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी सोमवार १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नारी शक्ती वंदन संमेलनाच्या माध्यमातून देशातील लोकप्रिय तसेच कर्तृत्ववान महिलांशी विज्ञान भवन येथे संवाद साधणार आहेत. भारताला २०४७ पर्यंत विकसित करण्यासाठी महिलांच्या नेतृत्वात करायच्या कामांविषयी चर्चा करणार आहेत. देशाच्या विकास कार्यक्रमात महिलांचा अधिकाधिक सहभाग असावा याच विचारातून पंतप्रधान मोदी लोकप्रिय तसेच कर्तृत्ववान महिलांशी संवाद साधणार आहेत. नारी शक्ती वंदन संमेलनात प्रशासन, शिक्षण, विज्ञान, क्रीडा, उद्योजकता, प्रसारमाध्यमे, समाजसेवा, संस्कृती अशा विविध क्षेत्रांतील लोकप्रिय तसेच कर्तृत्ववान महिला सहभागी होणार आहेत. देशाच्या निर्णय प्रक्रियेत महिलांचे प्रतिनिधित्व वाढवणे आवश्यक आहे, अशी केंद्र सरकारची भूमिका आहे.




### अंतरंग

सूर झाले पोरके : आशा भोसलेंना श्रद्धांजली/२

शेतकऱ्यांचा मत्स्यपालन व्यवसायाकडे कल/३

उरणमधून २.५ लाखांचे हेरॉईन जप्त/६


# सूरसम्राज्ञी आशा भोसले यांचे निधन

## चिरतरुण आवाज काळाच्या पडद्याआड

**मुंबई : प्रतिनिधी**

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांनी मुंबईतल्या ब्रीच कँडी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला आहे. वयाच्या ९२व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली. आपल्या चिरतरुण आवाजाने सगळ्या जगाला भुरळ घालणाऱ्या आशा भोसले या रविवारी (दि.१२) काळाच्या पडद्याआड गेल्या आहेत.



### सिनेसृष्टीची अष्टपैलु गायिका

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं निधन झालं असून वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. भारतरत्न आणि 'गानसम्राज्ञी' लता मंगेशकर यांची लहान बहीण असलेल्या आशा भोसले यांना हिंदी सिनेसृष्टीची वर्सटाईल गायिका म्हणून ओळखले जायचं. तब्बल सहा दशकं त्यांनी इंडस्ट्रीत आपल्या गाण्यांना आवाज दिला. त्यांनी केवळ हिंदीतच नाहीतर, मराठी, बंगाली, गुजराती, तमिल, तेलुगुसह अनेक भाषांमध्ये आशाताईंनी गाणी गायली आहेत.

आशा भोसले यांच्या छातीत संसर्ग झाल्याने त्यांना शनिवारी रात्री उशिरा ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. आज आशा भोसले यांचे पुत्र आनंद भोसले यांनी आशा भोसले यांच्या निधनाची माहिती दिली. सोमवारी दुपारी ४ वाजता आशा भोसले यांच्या पार्थिवावर अत्यंसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या जाण्याने हिंदी चित्रपटसृष्टी, गायन क्षेत्र आणि कला क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.

आशा भोसले यांचे चिरंजीव आनंद भोसले यांनी ही माहिती दिली की त्यांची आई आणि ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे निधन झाले आहे. आशा भोसलेंचे अवयव निकामी होत गेले, त्यामुळे त्यांचे निधन झाले. आशा भोसले यांना शनिवारी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आज त्यांची प्राणज्योत मालवली आहे. उद्या सकाळी ११ ते २ या वेळेत त्या लोअर परळ या ठिकाणी त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. दुपारी ४ वाजता शिवाजी पार्क या ठिकाणी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत, अशी माहिती आनंद भोसले यांनी दिली.

सांगली या ठिकाणी आशा भोसले यांचा जन्म झाला होता. वयाच्या १० व्या वर्षापासून त्यांनी गायनाला सुरुवात केली होती. गिनीज बुकमध्ये सर्वाधिक गाणी गाणारी गायिका अशी त्यांची नोंद झाली आहे. आपल्या वेगळ्या आवाजाची भुरळ सगळ्या जगाला पडली होती. त्या जरी आपल्याला सोडून गेल्या असल्या तरीही त्यांचं गाणं कायमच आपल्या सोबत राहणार आहे. तो आवाज कायमच आपल्याला साथ देईल यात शंका नाही.

आशाताईंनी अनेक अजरामर गाणी गायली. 'दम मारो दम' आणि 'ओम शांति ओम' यांसारखी अनेक सुपरहिट गाणी आशा भोसले यांनी इंडस्ट्रीला दिलीत.

**भारतातील सर्वात ख्यातनाम आणि अष्टपैलू आवाजांपैकी एक असलेल्या आशा भोसले जी यांच्या निधनाने अतिशय दु:ख झाले. त्यांच्या अनेक दशकांच्या अद्वितीय संगीत प्रवासाने आपल्या सांस्कृतिक वारशाला समृद्ध केले आणि जगभरातील असंख्य लोकांच्या मनाला स्पर्श केला. भावपूर्ण गीतांपासून ते जोशपूर्ण संगीत रचनांपर्यंत, त्यांच्या आवाजात कालातीत तेज होते. त्यांच्याशी झालेल्या संवादांच्या आठवणी मी सदैव जपून ठेवेन. त्या पुढील पिढ्यांना प्रेरणा देत राहतील आणि त्यांची गाणी सदैव लोकांच्या आयुष्यात गुंजत राहतील"**
**–पंतप्रधान नरेंद्र मोदी**

**सतत हसतमुख राहणाऱ्या, ९२ व्या वर्षीही त्यांचा उत्साह वाखणण्यासारखा होता. लता दीदींची आम्ही शंभरावी करू शकलो नाही, पण आशाताईंची शंभरावी करू शकू असं वाटलं होतं, पण काळाने ती संधी दिली नाही. इश्वरीय आवाज असलेल्या एक आमच्या गायिका आमच्यातून निघून गेल्या, मी त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करतो.**
**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

**विविध पुरस्कारांनी सन्मानित ज्येष्ठ गायिका आशाताई भोसले यांच्या निधनाची बातमी मनाला चटका लावणारी आहे. त्यांच्या मधुर, जादुई आणि भावस्पर्शी आवाजाने लाखो हृदयांना स्पर्श केला. त्यांच्या प्रत्येक गीतात भावना, प्रेम आणि जीवनाचा सुंदर अर्थ दडलेला होता. आज संगीतविश्वाने एक अमूल्य रत्न गमावले आहे. त्यांची आठवण आणि गाणी सदैव आपल्या हृदयात जिवंत राहतील. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती प्रदान करो! ॐ शांती!**
**–आमदार प्रशांत ठाकूर**

### अनेक पुरस्कारांनी गौरव

आशाताईंची गाणी अजरामर आहेत, आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर आशाताईंचा राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरव करण्यात आलाय. महाराष्ट्र सरकारनेही त्यांना महाराष्ट्र भूषण पूरस्कार देऊन गौरविले आहे. राष्ट्रीय फिल्म पुरस्कार (सर्वश्रेष्ठ महिला प्लेबैक गायिका) या पुरस्कार, दादासाहेब फाळके पुरस्कार, भारत सरकारकडून २००८ साली पद्मविभूषण पुरस्कार, महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन सन्मानित केले होते.

# महाराष्ट्रातूनही ५० लाख घुसखोर बांगलादेशी बाद होणार -किरीट सोमय्या

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय निवडणूक आयगाच्या वतीने विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा उद्देश मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करणे हा आहे. या प्रक्रियेदरम्यान मृत, स्थलांतरित, डुप्लिकेट, बेकायदेशीर बांगलादेशी अपात्र मतदारांची नावे वगळण्याचे काम करण्यात येत आहे.

या मोहिमेत मोठ्या प्रमाणावर नावे तपासण्यात आली असून पश्चिम बंगालमध्ये सुमारे ९० लाख घुसखोर बांगलादेशींची नावे यादीतून वगळण्यात आली आहेत. त्याच अनुषंगाने महाराष्ट्रातील जवळपास ५० लाख बेकायदेशीर बांगलादेशींची नावे वगळण्याचा आग्रह निवडणूक आयोगाकडे करण्यात येणार असल्याची माहिती भाजपचे ज्येष्ठ नेते माजी खासदार आणि या अभियानाचे प्रदेश संयोजक किरीट सोमेय्या यांनी रविवारी (दि.१२) पनवेल येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली. यावेळी त्यांच्यासमवेत भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, सभागृह नेते अ‍ॅड. प्रकाश बिनेदार यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.



### एसआयआर प्रक्रियेला यशस्वी करण्याचे आवाहन

किरिट सोमय्या यांनी नमूद केले की, एसआयआर ही प्रक्रिया पात्र नागरिकांची नोंदणी सुनिश्चित करणारी असून, बेकायदेशीररीत्या समाविष्ट झालेल्या नावांची छाननी करून त्यांना वगळण्यासही मदत करेल. लोकशाही मजबूत करण्यासाठी अचूक आणि विश्वसनीय मतदार यादी ही अत्यावश्यक आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी आपापल्या क्षेत्रात सक्रिय सहभाग नोंदवून प्रत्येक पात्र मतदारापर्यंत पोहोचावे आणि एसआयआर प्रक्रियेला यशस्वी बनवावे, असे आवाहनही किरीट सोमेय्या यांनी यावेळी केले.

तसेच खारघर व आजूबाजूच्या परिसरामध्ये बंगलादेशींनी बेकायदेशीर खुसखोरी केली आहे त्यामुळे याठिकाणी पाहणी करणार असून मुंब्रा कळवा या ठिकाणी खुसखोर बांगलादेशींचा शोध घेणार असल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले. भारताचे मूळ नसलेल्या लोकांचे नाव मतदार यादीत आहे, पण पूर्ण इतिहासात नाही अशा लोकांचे नाव वगळण्याची प्रकिया देशाच्या अनुषंगाने महत्वाची आहे. त्यानुसार आता २० एप्रिलपासून महाराष्ट्रात एसआयआर मोहीमचे काम सुरु होणार आहे. त्यामुळे घुसखोर मतदार यादीतून बाद होणार आहेत, असेही किरीट सोमय्या यांनी यावेळी स्पष्ट केले. त्यांनी पत्रकारांशी संवाद करताना पुढे सांगितले की, महाराष्ट्रात लवकरच भारतीय निवडणूक आयोग मार्फत मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेला प्रारंभ होणार आहे.

या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष राज्यभर संघटनात्मक पातळीवर व्यापक तयारी करत असून, प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट व्हावे यासाठी पक्ष कटिबद्ध असल्याचे किरीट सोमैय्या यांनी यावेळी सांगितले. पक्षांतर्गत स्तरावर या उपक्रमाला "मत शुद्धीकरण अभियान" असे संबोधण्यात आले असून, यामागील उद्देश म्हणजे मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह बनवणे हा आहे. (पान २ वर..)

## निवडक

### पुण्यात भोंदूबाबाचा महिलेवर लैंगिक अत्याचार; लाखोंचा गंडा

**पुणे :** अंगात दैवीशक्तीचा संचार असून, कौटुंबिक वादात तोडगा काढण्याचे आमिष दाखवत एका भोंदूने महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या भोंदूने बांधकाम व्यवसायात गुंतवणुकीवर चांगल्या परताव्याचे आमिष दाखवून या महिलेला ५० लाख ५५ हजार रुपयांचा गंडा घातला. या प्रकरणी स्वारगेट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. औदुंबर मनोहर गडदे (वय ४३, रा. तरटगाव, ता. पंढरपूर) असे या भोंदूचे नाव आहे.

### संसदेच्या विशेष अधिवेशनासाठी भाजप खासदारांसाठी व्हिप जारी

**नवी दिल्ली :** संसदेचे विशेष अधिवेशन १६ ते १८ एप्रिल या कालावधीत होणार आहे. या अधिवेशनाकरिता भारतीय जनता पक्षाने खासदारांसाठी तीन ओळींचा व्हिप जारी केला आहे. विशेष अधिवेशनात कामकाजासाठी हजर राहा असे स्पष्ट निर्देश भाजपने पक्षाच्या सर्व खासदारांना दिले आहेत. विशेष अधिवेशनात महिला आरक्षण विधेयक सादर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर भाजपकडून व्हिप जारी करण्यात आला आहे.

# रायगडच्या समुद्र किनाऱ्यांवर रोबोटीक जीव रक्षकांची गस्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

आपत्कालीन काळात बुडणाऱ्या पर्यटकांना वाचविण्यासाठी जीवरक्षक प्रणाली म्हणून जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यांवर रोबोटीक जीव रक्षक गस्त घालणार आहेत. जिल्ह्यातील तीन समुद्र किनाऱ्यांवर रोबोटीक लाईफ सेव्हिंग वॉटर क्राफ्ट तैनात केल्या जाणार आहेत. भविष्यात आणखिन १५ रोबोटीक लाईफ सेव्हींग वॉटर क्राफ्ट उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्यामुळे रायगडचे किनारे पर्यटकांसाठी अधिक सुरक्षित होण्यास मदत होणार आहेत.

रायगड जिल्ह्यात गेल्या काही वर्षात काशिद, दिवेआगर, हरिहरेश्वर, मुरूड, अलिबाग समुद्र किनाऱ्यांवर पर्यटक बुडण्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. ग्रामिण भागातील समुद्र किनाऱ्यांवर



जीव रक्षक तैनात करण्याचा खर्च स्थानिक ग्रामपंचायतींना परवडत नाही. हीबाब लक्षात घेऊन आता रायगडच्या समुद्र किनाऱ्यांवर रोबिटीक वॉटर क्राफ्ट तैनात केल्या जाणार आहेत.

सध्या रायगड जिल्ह्यातील तीन समुद्र किनाऱ्यांवर हे रोबोटीक लाईफ सेव्हींग वॉटर क्राफ्ट तैनात केले जाणार आहेत. यात अलिबाग तालुक्यातील नागाव, मुरुड तालुक्यातील काशिद तर श्रीवर्धन येथील समुद्र किनाऱ्यांचा समावेश असणार आहे. रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत या रोबोटीक वॉटर क्राफ्ट उपलब्ध करून दिल्या आहेत. येत्या काळात आणखिन १५ रोबोटीक लाईफ सेव्हींग वॉटर क्राफ्ट उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

या यंत्रणेला राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल तसेच नेव्हीच्या नौदलाच्या मानकांनुसार मान्यता मिळाली आहे. त्यासाठी आवश्यक चाचण्याही पूर्ण झाल्या असल्याचे सांगितले जात आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यातील प्रमुख समुद्र किनाऱ्यांसाठी उपलब्ध करून ली जाणार आहे. रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या संकल्पनेतून या रोबोटीक लाईफ सेव्हिंग वॉटर क्राफ्ट उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

(संबंधित वृत्त पान ७ वर..)

## देशातील १२ राज्यांना वादळाचा इशारा

**नवी दिल्ली :** देशभरात हवामानात सातत्यानं बदल होत असतानाच एका नव्या प्रणालीमुळं वातावरणात पुन्हा एकदा वाऱ्याची दिशा बदलल्याचं स्पष्ट होत आहे. चक्राकार वाऱ्यांची निर्मिती, ज्याचा परिणाम देशातील १२ राज्यांवर होणं अपेक्षित आहे. जिथं वाऱ्याचा वेग ताशी ५० – ६० किमी राहण्याचा अंदाज असून, गारपिटीचीही शक्यता वर्तवण्यात आली आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा आणि नजीकचा परिसरसुद्धा या स्थितीस अपवाद नाही.

महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये तापमानवाढ झाल्यामुळं पारा चाळीशीपार गेला आहे. तर, काही जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरणामुळं हवामानाची ही कोंडी आणखी अडचणी वाढवताना दिसेल असा अंदाज आहे. प्राथमिक निरीक्षणानुसार उत्तर महाराष्ट्रावर निर्माण झालेल्या उच्च दाबाच्या क्षेत्रामुळे राज्यात उष्ण वारे वाहू लागले आहेत. परिणामस्वरुप महाराष्ट्रात तापमानवाढीस सुरुवात झाली असून, फक्त पुढील २४ तासच नव्हे, तर पुढील आठवडाभर संपूर्ण राज्याची होरपळ होईल, असा अंदाज आहे.

# महाराष्ट्रात पुन्हा एकदा निवडणुकीचा धुरळा!

## ३५९१ ग्रा.पं. सदस्यांसाठी २८ एप्रिलला मतदान

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात पुन्हा एकदा निवडणुकीचा धुराळा उडाला आहे. ग्रामपंचायत निवडणुका जाहीर झाल्या आहेत. २८ एप्रिलला ३५९१ जागांसाठी मतदान होणार आहे.

ग्रामपंचायत निवडणुकीसंदर्भात महाराष्ट्रातील ३४ जिल्ह्यामध्ये मतदान होणार आहे. या जिल्ह्यामध्ये ४७१ थेट सरपंचपदासाठी मतदान होणार आहे. तर उर्वरित ३१२० सदस्य रिक्त जागांवर निवडणूक होतील. एकूण ३५९१ जागांसाठी २८ एप्रिल रोजी मतदान होणार असून या ग्रामपंचातीमध्ये आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. अनेक दिवसांपासून गावकरी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी वाट पाहत होते.

ग्रामपंचायत निडणुकीसाठी नामनिर्देशनपत्रे १३ एप्रिल २०२६ म्हणजे सोमवारी उद्या शेवटचा दिवस असणार आहे. तर नामनिर्देशनपत्रांची छाननी १५ एप्रिल २०२६ रोजी करण्यात येणार आहे. नामनिर्देशनपत्रे १७ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत मागे घेऊ शकता. तर २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या दरम्यान तुम्ही मतदान करायचे आहे. तर तुमचा सरपंच कोण असणार हे २९ एप्रिल २०२६ रोजी म्हणजे यादिवशी मतमोजणी होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे गडचिरोली आणि गोंदिया या नक्षलग्रस्त भागात सकाळी ७.३० ते दुपारी ३ वाजेपर्यंतच मतदान करता येणार आहे.

# पनवेलमध्ये घुमला 'कृष्ण वेणुनाद'

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेला 'कृष्ण वेणुनाद' हा विशेष सांगीतिक कार्यक्रम रविवारी पनवेल येथील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात उत्साहात पार पडला.

एकनाथ ठाकूर गुरुकुल निर्मित आणि रंगरचना कलामंच, पनवेल यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात ज्येष्ठ बासरीवादकांनी सुमारे ५० हून अधिक बासरीवादकांसह अनोखी स्वरयात्रा सादर केली. या सुरेल मैफलीने उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमात इंडियन आयडल फेम गायिका प्रज्ञा गावंड यांनीही आपल्या मधुर आवाजाने रंगत वाढवली.

या कार्यक्रमास लोकनेते रामशेठ ठाकूर, कामगार नेते रवि नाईक, प्रसिद्ध गायक गोपाल पाटील, भाजप सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, हास्यसम्राट संजीवन म्हात्रे, चिन्मय समेळ हे मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संगीत संयोजन विवेक ठाकूर यांनी केले, तर निवेदन विजय पवार यांनी प्रभावीपणे सादर केले. मोठ्या संख्येने उपस्थित नागरिकांनी या सांस्कृतिक सोहळ्याचा आनंद घेतला.

दरम्यान, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षपूर्ती निमित्त वर्षभर अनेक सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक उपक्रम सुरू आहेत.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धती आणि निधीत बदल

**मुंबई : प्रतिनिधी**

सर्वसामान्य रुग्णांसाठी जीवनदायिनी ठरलेल्या मुख्यमंत्री सहायता निधीच्या अर्ज प्रक्रियेत मोठा बदल करण्यात येणार आहे. यामुळे सहाय्यता निधीच्या कार्यपद्धती आता पूर्णपणे ऑनलाइन होणार असून सर्व कागदपत्रे आणि निर्णय घेण्याची प्रक्रियाही ऑनलाइन असणार आहे. यामुळे रूग्णांना दिलासा मिळणार असून मुंबईत मंत्रालयाच्या फेऱ्या वाचणार असून चकरा मारण्याची गरज भासणार नाही.

तर अर्ज अपलोड केल्यानंतर ३ ते ८ कार्यालयीन तासांच्या आत मदतीचा निर्णय रुग्णालय आणि नातेवाईकांना कळवला जाईल. तसेच सुरुवातीला ३० टक्के रक्कम आणि उर्वरित रक्कम रुग्णाला डिस्चार्ज मिळताना दिली जाईल, अशी देखील माहिती आहे. तर या नवीन डिजिटल प्रणालीचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुढील आठवड्यात होण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री सहायता निधीच्या कार्यपद्धतीत मोठा बदल करण्यात आला असून आता अर्ज प्रक्रियेसाठी नवीन ऑनलाईन पोर्टल विकसित करण्यात आले आहे. यामुळे, दि. ७ एप्रिल २०२६ पासून जुनी पद्धत पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. तर आता यापुढे सर्व अर्ज फक्त ऑनलाईन माध्यमातूनच स्वीकारले जाणार आहेत. यामुळे आता रुग्णांना किंवा त्यांच्या नातेवाईकांना धावाधाव करावी लागणार नाही. तर आता हे काम रुग्णालयांनी करायचे आहे.

मुख्यमंत्री सहायता निधीसाठी संबंधित रुग्णालयांनाच रुग्णाची कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करावी लागणार आहेत. यासाठी प्रत्येक रुग्णालयाला तशी तरतूद करावी लागणार आहे. रुग्णालयाने आपला अधिकृत ई–मेल आयडी नोंदवून युजर आयडी व पासवर्ड तयार करायचा आहे. तो प्राप्त झाल्यानंतर E–KYC प्रक्रिया पूर्ण करून तेथूनच अर्ज करणे बंधनकारक असणार आहे.

## अमरनाथ यात्रा ३ जुलैपासून

**श्रीनगर :** अमरनाथ यात्रेच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. जम्मू–काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी दिलेल्या माहितीनुसार, या वर्षीची ही वार्षिक तीर्थयात्रा ३ जुलै २०२६ रोजी सुरू होईल. रक्षाबंधनाच्या शुभ मुहूर्तावर, २८ ऑगस्ट २०२६ रोजी या यात्रेची सांगता होईल. या वेळी ही तीर्थयात्रा एकूण ५७ दिवसांपर्यंत चालेल आणि यामध्ये लाखो भाविक सहभागी होण्याची अपेक्षा आहे.

तीर्थयात्रेच्या औपचारिक सुरुवातीपूर्वी, भगवान शंकराचा आशीर्वाद प्राप्त करण्यासाठी 'प्रथम पूजा' (पहिली उपासना) आयोजित केली जाईल. हा विशेष विधी 'ज्येष्ठ पौर्णिमे'च्या दिवशी विशेषतः २९ जून २०२६ रोजी पार पाडला जाईल. याच दिवसापासून तीर्थयात्रेसाठीचे आध्यात्मिक वातावरण निर्माण होण्यास सुरुवात होते.

भाविकांच्या सुरक्षेसाठी आणि गर्दीच्या व्यवस्थापनासाठी आगाऊ नोंदणी करणं अनिवार्य आहे. या वर्षी, नोंदणी प्रक्रिया १५ एप्रिल २०२६ रोजी सुरू होईल. भाविक ऑनलाईन आणि ऑफलाइन अशा दोन्ही माध्यमांतून नोंदणी करू शकतात.

# गारे पालमा कोळसा खाण प्रकल्प राज्याच्या ऊर्जा सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा -मुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यातील ऊर्जा सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या उच्च दर्जाच्या कोळसा खाणीमुळे कोळशाचे अवलंबित्व कमी होणार आहे. तसेच पर्यावरणाच्या संवर्धनासोबत विजेचे दर कमी होऊन भविष्यातील ऊर्जा गरज पूर्ण होणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

महानिर्मितीच्या छत्तीसगड राज्यातील गारे पालमा सेक्टर -२ कोळसा खाणीतून कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात येणाऱ्या पहिल्या कोळसा रेल्वेरॅक चे आगमन झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी रेल्वेरॅकला हिरवी झेंडी दाखवून कोळसा हातळणी प्रकल्पाची पहाणी केली. त्यावेळी मार्गदर्शन करतांना ते



बोलत होते.

यावेळी राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महानिर्मितीचे अध्यक्ष राधाकृष्णन बी, संचालक अभय हरणे, कार्यकारी संचालक नितीन वाघ, गारे पालमा कोळसा खाणीचे मुख्य अभियंता शैलेश पडोळे, कोराडी औष्णीक प्रकल्पाचे मुख्य अभियंता सुदीप राणे, कार्यकारी संचालक पंकज सपाटे, गिरीश कुमार, मध्य रेल्वेचे विभागीय महाव्यवस्थापक दीपककुमार गुप्ता, विनायक गर्गा, आदी पदधकारी व अधिकारी उपस्थित होते.

गारे पालमा या कोळसा खाणीतून अत्यंत उच्च दर्जाचा कोळसा उपलब्ध होत असल्यामुळे ऊर्जा निर्मितीची क्षमता वाढणार असल्याचे सांगतांना मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की ऊर्जा निर्मितीसाठी असलेले अवलंबित्व त्यामुळे कमी होणार आहे. तसेच पर्यावरणा सोबत विजेचे दर कमी होण्यास मदत होणार आहे. राज्यातील लोडशेडींग राहणार नाही तसेच शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करणे सुलभ होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

महानिर्मितीला गारे पालमा ही कोळसा खाण आवंटीत झाली असून १ हजार ५८३.४८७ हेक्टर मध्ये असलेल्या खाणीमुळे पुढील ७७ वर्ष उच्च दर्जाचा कोळसा उपलब्ध होणार आहे. या खाणीत मार्च २६ पासून उत्पादन सुरू झाले

या कोळसा खाणीमधून कोराडी, चंद्रपूर आणि परळी येथे दीर्घकालीन पुरवठा होणार आहे. कोळशाच्या गुणवत्तेवर नियंत्रण राहणार आहे. भविष्यातील वीज तुटवड्याचा धोका कमी होणार आहे. तसेच दीर्घकालीन शाश्वत विकासासाठी एक महत्वाचे पाऊल ठरणार आहे.

## बीएलओंचा भार चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांवर

**उरण : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील निवडणूक प्रक्रियेत उरण नगरपरिषद प्रशासनाचा भोंगळ आणि मनमानी कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. केंद्रस्तरीय अधिकारी सारखी जबाबदारीची कामे चक्क चतुर्थ श्रेणी (वर्ग ४) कर्मचाऱ्यांच्या गळ्यात टाकण्याचा प्रकार उघडकीस आला आहे.या बाबीमुळे प्रशासनाच्या निर्णयक्षमतेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहेत.

शासनाचे नियम आणि निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांना धाब्यावर बसवत, हे काम तृतीय श्रेणी (वर्ग ३) कर्मचाऱ्यांकडून करून घेण्याऐवजी चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांवर लादण्यात आले आहे.

हा प्रकार केवळ नियमभंग नसून निवडणूक प्रक्रियेलाच धोक्यात टाकणारा आहे.त्यामुळे या अन्यायकारक निर्णयाविरोधात उरण नगरपालिकेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांनी थेट आक्रमक भूमिका घेत संबंधित अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले आहे. या निवेदनावर तब्बल १९ कर्मचाऱ्यांच्या सह्या आहेत.अशी माहिती कर्मचारी विजय पवार यांनी दिली.

बीएलओ पदाचे काम हे पूर्णतः ऑनलाईन आणि इंग्रजी भाषेत पार पाडावे लागते. अशा परिस्थितीत तांत्रिक ज्ञान नसलेल्या कर्मचाऱ्यांवर ही जबाबदारी लादणे म्हणजे अपयशाची बीजं पेरण्यासारखं असल्याची संतप्त भावना कर्मचाऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.

## महिलांच्या यशोगाथांना मिळणार व्यासपीठ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत दि. ०९एप्रिल, २०२६ पासून पुढील १५दिवस 'महिला सक्षमीकरण' मोहिमेअंतर्गत व्यापक प्रसिद्धी अभियान राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश केंद्र व राज्य शासनाच्या महिलाभिमुख योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचवणे आणि लाभार्थ्यांच्या यशोगाथांना व्यासपीठ मिळवून देणे, हा आहे.

कोकण विभागातील ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि पालघर जिल्ह्यातील ज्या महिलांनी शासनाच्या विविध योजनांचा (उदा. महिला बचत गट, कौशल्य विकास, अर्थसहाय्य योजना) लाभ घेऊन आपले जीवन समृद्ध केले आहे, अशा महिला तसेच शासन सेवेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान महिला यांनी आपली माहिती, फोटो किंवा छोटे व्हिडिओ आपल्या जिल्हयातील जिल्हा माहिती कार्यालयाकडे पाठवावेत, असे आवाहन विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग यांनी केले आहे.

**अशा प्रकारे तुम्ही सहभागी होवू शकता**

विशेष प्रसिद्धी अभियानासाठी खालील बाबींची आवश्यकता आहे: यशकथा (Success Stories): योजनेचा लाभ घेवून तुम्ही सुरू केलेला व्यवसाय किंवा प्रगतीबद्दलची माहिती. UGC (युझर जनरेटेड कंटेंट): योजनेच्या लाभार्थ्यांनी आपला फोटो किंवा योजनेच्या लाभासोबतचा सेल्फी (Selfie with Scheme) पाठवावा. व्हिडिओ बाईट्स: आपला अनुभव सांगणारा छोटा व्हिडिओ किंवा मुलाखत. आपल्या जिल्ह्यातील जिल्हा माहिती कार्यालयाच्या ईमेल पत्त्यावर पाठवावे.

या यशोगाथांना स्थानिक वृत्तपत्रे, आकाशवाणी, सोशल मीडिया (फेसबुक, इंस्टाग्राम, एक्स), आणि डिजिटल ई-बुकलेटच्या माध्यमातून राज्यस्तरावर प्रसिद्धी दिली जाणार आहे. स्थानिक इन्फ्लुएन्सर्सच्या माध्यमातूनही या मोहिमेचा प्रचार करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील इच्छुक महिला लाभार्थ्यांनी अधिक माहितीसाठी व आपली माहिती देण्यासाठी आपापल्या जिल्हा माहिती कार्यालयाशी तातडीने संपर्क साधावा.

## बेलोशी येथील व्यक्तीस ऑनलाईन व्यवसायाचे आमिष दाखवून फसवणूक

**रेवदंडा : प्रतिनिधी**

ऑनलाईन फेसबुक व वॅट्सअप चॅटीग व्दारे व्यवसायातून मोठया नफयाचे आमिष दाखवून लाखो रूपयांची आर्थिक फसवणूक केल्याची तक्रार रेवदंडा पोलीस ठाणे येथे बेलोशी येथील इसमाने केली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, अलिबाग तालुक्यातील बेलोशी येथील ४७ वर्षीय परेश गुंड यांना अज्ञात महिलेने दि. २९ मार्च २०२६ ते दि. ७ एप्रिल २०२६ दरम्यानचे वेळेत फेसबुकव्दारे मैत्री करून व वॅट्सअप व्दारे चॅटीग व व्हाईस कॉल करून विश्वास संपादन केला व त्यास जास्त नफा मिळविण्याचे आमिष दाखवून त्यास मोबाईल लिंक पाठवून त्या लिंकवरून त्यांचेकडून युपीआय व्दारे एकूण रूपये ६ लाख १६ हजार ११३ रूपये ४० पैसे एव्हढी रक्कम काढून घेतली. मात्र या मध्ये सदर महिलेने मोठया नफाचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक केल्याचे परेश गुंड यांचे लक्ष्यात येताच त्यांनी रेवदंडा पोलिस ठाणे येथे अनोळखी महिलेच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे.

रेवदंडा पोलीस ठाणे येथे ४६/२०२६ ने अनोळखी महिलेच्या विरोधात माहिती तंत्रज्ञान अधिनियम २०००, २००८ चे सुधारणेसह ६६ डि,भारतीय न्याय संहिता २०२३३१८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलिस निरिक्षक परशुराम कांबळे हे करत आहेत.

## मुरबाड खोपोली राष्ट्रीय महामार्गाने बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मोबदला मिळणार

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातून जाणाऱ्या शहापूर - मुरबाड - कर्जत - खोपोली रस्त्याचे रूपांतर दुपदरी रस्त्यात झाले. त्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनीवर रस्ता बनवण्यात आला. मात्र त्या बदल्यात त्या शेतकऱ्यांना कोणताही मोबदला देण्यात आला नाही. ही बाब लक्षात घेऊन कर्जत तालुक्यातील विविध शेतकऱ्यांनी रस्त्यातून होणारी वाहतूक थांबवली होती. तसेच अनेक शेतकऱ्यांनी अनेकवेळा आंदोलने केली आहेत. मात्र शेतकऱ्यांची हि समस्या सोडवण्यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांनी पुढाकार घेतला आहे. या रस्त्यासाठी जमीन देणाऱ्या १४० शेतकऱ्यांना मोबदला देण्यावर एकमत झाले असून राज्य रस्ते विकास महामंडळाकडून जमिनीचा मोबदला देण्याचा निर्णय झाला आहे.

शहापूर मुरबाड कर्जत खोपोली राष्ट्रीय महामार्ग ५४८ अ वर कर्जत आणि खालापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी रस्त्यासाठी दिलेल्या जमिनीचा मोबदला देण्याची मागणी राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडे केली होती. कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांनी राज्य रस्ते विकास महामंडळासोबत बैठक कर्जत प्रांत अधिकारी कार्यालयात बोलावली होती. प्रांत अधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीला आमदार थोरवे यांच्यासह तालुक्याचे तहसीलदार डॉ. धनंजय जाधव, कर्जत पोलीस उपाधीक्षक राहुल गायकवाड, खालापूर पोलीस उप अधीक्षक तसेच तालुक्यातील बहुसंख्य विभागाचे विभागप्रमुख अधिकारी उपस्थित होते. यावेळी खालापूर तालुक्यातील नावंढे, डोलवली, हाल खुर्द तसेच कर्जत तालुक्यातील तळवली, वर्णे आणि नांगुर्ले या गावांतील शेतकरी तसेच शिवसेना पक्षाचे उप तालुका प्रमुख ॲड. प्रदीप सुर्वे, कर्जत नगरपरिषद विरोधी पक्षाचे नेते ऍड. संकेत भासे आदी उपस्थित होते.

त्यावेळी शेतकऱ्यांची मागणी योग्य असून तुम्ही रस्त्यासाठी जागा घेणार असाल आणि त्यावेळी भूसंपादन कायदा लागू होत असेल तर तात्काळ मदत केली पाहिजे अशी रोखठोक भूमिका घेतली. शेवटी राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी या रस्त्यात जमीन गेलेल्या शेतकऱ्यांना मोबदला देण्याचे मान्य केले.

## ओव्हरलोड ट्रकचा भीषण अपघात; क्लीनर गंभीर जखमी

**म्हसळा : प्रतिनिधी**

श्रीवर्धनम्हसळा रस्त्यावर ओव्हरलोड बॉक्साईड वाहतूक करणाऱ्या ट्रकचा भीषण अपघात आज सकाळी सुमारे ७ ते ८ वाजण्याच्या दरम्यान घडला. म्हसळा- सकलप जवळील उतारावर गाडीवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला. या अपघातात ट्रकमधील क्लीनर माझ अझर करमटणी (वय २६, रा. श्रीवर्धन) गंभीर जखमी झाला असून त्याच्या दोन्ही पायांना तसेच डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. जखमीस प्रथम म्हसळा ग्रामीण रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी माणगाव येथे हलविण्यात आले.

स्थानिकांच्या माहितीनुसार, या श्रीवर्धनम्हसळा मार्गावर ओव्हरलोड बॉक्साईड वाहतूक करणाऱ्या किमान ७ ते ८ गाड्यांचे यापूर्वीही अपघात झाले आहेत, ज्यामुळे हा रस्ता अपघातप्रवण बनत चालला आहे.या पार्श्वभूमीवर, आरटीओ व पोलीस प्रशासनाने या अपघातांचा सखोल अभ्यास करून भविष्यात असे प्रकार टाळण्यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी माजी सभापती महादेव पाटील यांनी केली आहे.



पान १ वरुन

## महाराष्ट्रातूनही ५० लाख घुसखोर बांगलादेशी बाद होणार -किरीट सोमय्या

या प्रक्रियेत पात्र नागरिकांची नोंदणी सुनिश्चित करण्याबरोबरच, यादीतील त्रुटी दुरुस्त करणे आणि अपात्र नोंदी वगळणे यावर भर दिला जाणार आहे. या अनुषंगाने, राज्यातील सुमारे एक लाख मतदान केंद्रांवर पक्षाचे कार्यकर्ते सक्रिय करण्यात येत आहेत. "पन्ना प्रमुख" व्यवस्था बळकट करून प्रत्येक मतदाराशी प्रत्यक्ष संपर्क साधण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. स्थानिक पातळीवर मतदारांना आवश्यक कागदपत्रे, नोंदणी प्रक्रिया आणि पडताळणी याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. एसआयआर उपक्रमांतर्गत सध्याच्या मतदार यादीची२००२ च्या मूळ यादीशी (स्वतः किंवा वारसदाराच्या नावाने) तुलना करण्यात आली असता सुमारे २० टक्के जुळणी आढळून आली. ग्रामीण भागात हे प्रमाण ७० ते ८० टयांदरम्यान असताना, शहरी भागात ते सुमारे ५० टक्के आहे. या आकडेवारीच्या आधारे मतदार नोंदणी व पडताळणी प्रक्रियेला अधिक गती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# सूर झाले पोरके

प्रसिद्ध पार्श्वगायिका आशा भोसले यांचे मुंबईच्या ब्रीच कँडी रुग्णालयात निधन झाले. त्या ९२ वर्षांच्या होत्या. आशा भोसले यांना शनिवार, ११ एप्रिल २०२६ रोजी हृदयविकाराचा झटका आल्यामुळे ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. या १९४८ मध्ये आलेल्या चित्रपटापासून आशा भोसले यांच्या पार्श्वगायनाच्या कारकिर्दीला सुरुवात झाली. त्यांनी वीसपेक्षा जास्त भाषांमध्ये १६ हजारांपेक्षा जास्त गाणी गायली. मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती, पंजाबी, भोजपुरी, तमिळ, मल्याळम, इंग्रजी आणि रशियनसह एकूण २० भाषांमध्ये आशा भोसले यांनी पार्श्वगायन केले.

आशा भोसले यांचा आवाज म्हणजे केवळ गाणे नव्हते तर प्रत्येक भावनेला जिवंत करणारी जादू होती. त्यांच्या कारकिर्दीसाठी पद्म विभूषण पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले होते. आवाजात रोमॅन्स, विरह, खट्याळपणा आणि गझलेची नजाकत एकाच वेळी अनुभवायला मिळत होती. त्यांचा आवाज म्हणजे भारतीय संगीतविश्वाचा एक अमर ठेवा आहे. गेल्या आठ दशकांहून अधिक काळ आपल्या सुरेल, बहुआयामी आणि जादुई आवाजाने कोट्यवधी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा हा स्वर आज कायमचा शांत झाला आहे. त्यांच्या आठवणींना उजाळादेण्यासाठी ज्येष्ठ पत्रकार दिनेश गुणे यांनी आशाताईंबद्दल लिहिलेला हा लेख...

अध्यात्माचा आधार मिळाला, की मन खंबीर होते; आणि कोणत्याही समस्येला सामोरे जाण्याची शक्ती मनाला मिळते, असा आपला पिढय़ान पिढय़ांपासूनचा अनुभवसिद्ध विश्वास आहे. पण प्रत्येक सामान्य, संसारी माणसाला अध्यात्माची ती- ब्रह्मानंद देणारी- अवस्था साधता येत नाही. त्यावरही माणसानं उपाय शोधून काढला आणि मनाला आध्यात्मिक सुखाची अनुभूती देणारं, अलौकिकाशी नातं जोडणारं एक अजोड साधन प्राप्त झालं.. संगीत! कान आणि मन यांचा सुंदर मेळ साधणारे हे साधन म्हणजे, माणसाच्या दैनंदिन जीवनाचा एक अनवट आनंद ठरला.

ज्या काळी संगीताचे स्वर्गीय सूर सामान्यांच्या कानापर्यंत पोहोचण्याची साधनं मर्यादित होती, त्या काळातही संगीताचे उपासक आपापल्या परीने असंख्य मनांचे जगणे सुरांच्या सुखद शिंपणीतून आनंदमय करत राहिले. गेल्या चार पिढय़ांची मने संगीताच्या बहरात चिंबचिंब करणारा, आणि त्या धुंदीत विहरणाऱ्या मनांना एका चंदेरी दुनियेच्या सफरीचा आनंद देणारा दैवी आवाज आपल्याभोवती चांदणे शिंपत आहे, हे आपले परमभाग्य आहे. सहस्रचंद्रदर्शनाची उमेद बाळगणाऱ्या सुराचं नाव, आशा भोसले!

त्यांच्या स्वराची रसिकमनावरची जादू वर्षांनुर्वष उंचावतच राहिली. लाडिक, मधाळ स्वभावाचे प्रेमगीत असो, भक्तिरसाने ओथंबलेले भजन असो, पडद्यावरच्या दृश्यांना जिवंतपणा देणारे चित्रपटगीत असो, पाश्चात्त्य संगीतसंस्कृतीची झाक असलेले पॉप-रॉक संगीत असो, विरहव्यथांच्या व्याकुळतेला शब्दरूप देणारी गझल असो.. आपल्या स्वर्गीय सुरांच्या मोहिनीने गीताच्या प्रत्येक शब्दालाच घायाळ करत तो रसिकांच्या मनावर मधाळपणे कोरणारा आशाताईंचा सूर . हिंदी, मराठी, बंगाली आणि विदेशी गीतांनाही आपल्या स्वरांचा साज चढवून जागतिक विक्रमाची नोंद करणाऱ्या या मराठमोळ्या आवाजाने, अवघे 'सूरक्षेत्र' व्यापले.. एवढेच नाही, तर जिथेजिथे या सुरांची शिंपण झाली, तिथेतिथे अक्षरशः चांदणे फुलले.. कॅबरे असो वा कव्वाली, भजन असो वा भांगडा, नाटय़गीत असो वा भावगीत, आशाताईंच्या आवाजाने गीतांचे शब्द आनंदाच्या हिंदोळ्यावर झुलले आणि चैतन्याचे बगिचे फुलले. सुरांच्या साहाय्याने केवळ मराठी नव्हे, तर जगभरातील रसिकांच्या मनावर अधिराज्य करणाऱ्या आशाताईंच्या या स्वराने गायनकला धन्य केली, आणि संगीताला स्वर्गसुख दिले.



मानवी विकासाच्या वाटा विस्तारत चालल्या आणि भौतिकाची वास्तव विचारांशी जवळीक वाढत गेली तसतसा अध्यात्माचा आवाज क्षीण होत गेला असेल; पण संगीत मात्र सर्वकाळ बहरत आणि मनामनावर बरसतच राहिले. कानाशी आणि कानातून मनाशी नातं जोडणाऱ्या, मनाला आणि शरीरालाही ताजेपणा देणाऱ्या संगीताचे सूर हा जगण्याचा एक अविभाज्य भाग होऊन राहिला, संगीताने जगण्याला आनंदाचा अर्थ दिला. शहरी कोलाहलात, जिथे गर्दीला चेहरा नसतो आणि व्यवहाराच्या घाईत चेहऱ्यांची ओळख शून्य ठरते, तिथेदेखील आशाताईंच्या सुरांच्या पंचमलगडी अलगद उलगडू लागल्या की कान जागे होतात, मन खुलू लागते. शरीर ठेका धरू लागतं, आणि या सुरानंदात विहरणारी अनेक मने परस्परांशी जोडली जातात. एखाद्या समेवर एकाच क्षणी दाद देतात, आणि परस्परांपासून वास्तवात दूर असलेल्या त्या मनांचा अव्यक्त संवाद सुरू होतो. सुरांच्या त्या जादूनं मनं जवळ येतात. संगीताची ही शक्ती अध्यात्माइतकीच अलौकिक आहे. म्हणूनच, तीन पिढय़ांना आनंद देणारा त्यांचा सूर आजदेखील तितकाच टवटवीत आहे. या तीन पिढय़ांची जीवनमूल्ये आपसूक काळाबरोबर बदलत गेली असे आपण आज म्हणतो. परंपरांचा अपमान न करता नवेपणा शोधणारी पिढी, आनंदाचे नवे मार्ग शोधताना स्वतःमध्ये रममाण होऊन परंपरेपेक्षा भावनांचा आदर करणारी पिढी आणि शारीरिक पातळीवरल्या- भौतिक- आनंदात आदर वगैरे मोजपट्टय़ा हव्याच कशाला, असे मानणारी पिढी..

अशा तीन पिढय़ा आशाताईंच्या गळय़ात एकाच वेळी नांदतात. आशाताईंचा आवाज घरंदाज, भाववाही आणि मादकही एकाच वेळी आहे. मानवी भावभावनांच्या सर्व स्तरांवर हा सूर सहजतेनं फिरला. केवळ पारंपरिक वाद्ये आणि कंठस्वरांच्या सुंदर मिलाफातून भक्तिरसाने ओथंबलेले 'कानडा वो विठ्ठलु कर्नाटकु'सारखे शब्द आशाताईंच्या मुखातून परमार्थाशी नातं जोडतात. निखळ सांगीतिक आनंद देऊन निव्वळ सुरांमधून शारीर लालसेची अनुभूती 'हुस्न के लाखों रंग..'सारखी नृत्यगीतं देतात. तर, 'मेरा कुछ सामान..' मधून भावकवितेचा तरल अनुभव किती जवळचा असू शकतो याचं भान आपल्याला अल्वारपणे येतं. संगीत आणि जगणे हातात हात घालूनच वाटचाल करत राहते..

जगण्याचे हे विविधांगी भान हिंदी चित्रपटसृष्टीने गाण्यांमधून खुलवले, वाढवले. सर्वसामान्यांच्या मनातल्या अनेक अव्यक्त भावभावना सुरांच्या साथीनेच व्यक्त झाल्या, तेव्हा गीतकार-संगीतकाराला त्या त्या वेळी दाद देता देता, एकेका आवाजाची खासियत मात्र सतत ऐकणाऱ्यांची सोबत करत राहिली. चित्रपटसृष्टीतले हेवेदावे एकेकाळी एखाद्या सुराचा घात करत, पुढे मार्केटचे हिशेब हीच खलनायकी करत राहिले. पण आशाताईंचा आवाज हे सारे बदसूर टाळत राहिला.. सुरांच्या वैविध्याचे मोल ओळखत राहिला. कधी अवखळपणे खोडी काढणारा तर कधी हृदयातली सल बाहेर काढणारा, कधी शृंगाराच्या स्वर्गात गुलछरे उडवणारा तर कधी गझलेच्या काफियांगणिक जीवनाचं गुज गुंजवणारा.. त्याच वेळी संगीताच्या मार्केटला गुंग करून टाकत, हा आवाज थेट ऐकणाऱ्याशी नातं जोडत राहिला. आता तर संगीत आपल्या प्रत्येक व्यवहारासोबत, अगदी कानाशी येऊन थांबले आहे.. जगणे संगीतमय होऊन गेले. डोक्यावर ओझ्याचा भार वाहणारा कष्टकरी असो, धावपळ करणारा एखादा व्यावसायिक असो, वा एखाद्या वातानुकूलित दालनातल्या कार्यालयात फायलींच्या ढिगाऱ्यात डोके खुपसून काम करणारा बुद्धिजीवी असो..

सूर कानाशी गुंजत असला, की कामाचे कष्ट हलके होतात, हा प्रत्येकाचाच अनुभव असतो.. सुराचे देणे कुणीतरी देत असते, पण तो घेणारे असतात अनेकजण. सूर पक्का असला, तर देणाऱ्या-घेणाऱ्यातला द्वैतभाव संपतो. सुरांचे हे अद्वैत म्हणजे ब्रह्मानंदसहोदर आनंद. कामप्रेरणेपासून ते चांगलं गाणं ऐकण्यापर्यंतच्या अनेक प्रेरणा माणसाला जणू ब्रह्मानंदच मिळाल्याचा आभास देतात. तो आभासही चैतन्याचे झरे जागता ठेवतो. आशाताईंचा स्वर जिथे बरसला, तिथे चैतन्याचे झरे खळाळू लागले. आशाताईंचा स्वर कानावर पडला नाही, असा दिवस गेल्या अनेक दशकांत उजाडला नाही, आणि मावळलाही नाही. या स्वराने असंख्य क्षण फुलविले, आणि फुलवत शकुनाच्या मेंदीने रंगलेले जगण्याचे असंख्य क्षण हसविलेदेखील.. या स्वराचा साज कालातीत आहे. या टवटवीत स्वराचे चांदणे आशाताईंनी असेच शिंपत जावे, आणि बहरलेली मने जेव्हा आत्मानंदात विहरू लागतील, तेव्हा याच स्वरांच्या हिंदोळ्यावर बसवून त्यांना चैतन्याच्या झऱ्याकाठी घेऊन जावे.. भौतिकाचा अतिरेकी आघात असह्य झालेली असंख्य आयुष्ये आशाताईंच्या आवाजाच्या आधाराने आनंदी राहणार आहेत.

**-दिनेश गुणे, ज्येष्ठ पत्रकार.**

## निवडक

### जुगार खेळणाऱ्या तिघांवर गुन्हा

**पनवेल :** मटका जुगारावर कारवाई करत खारघर पोलिसांनी अक्षय अशोक वाघमारे (पापडीचा पाडा, सेक्टर ३९), दिगंबर गडंबे (पापडीचा पाडा), अंकुश विजय जाधव (पापडीचा पाडा, सेक्टर ३९) यांच्या विरोधात खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. पापडीचा पाडा, सेक्टर ३९ या ठिकाणी मटका जुगार चालवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार छापा टाकून तिघांना ताब्यात घेतले. त्या ठिकाणाहून एक मोबाईल आणि रोख रक्कम ताब्यात घेतली.

### कारची काच फोडून चोरी

**पनवेल :** लग्नाच्या तयारीत असलेल्या कुटुंबाच्या आनंदावर पाणी फिरवणारी घटना सीबीडीत घडली. खारघर येथील एका कुटुंबाने लग्नाचा बस्ता घेऊन रात्रीच्या जेवणासाठी थांबले असताना, चोरट्यांनी त्यांच्या कारची काच फोडून लॅपटॉप, दीड लाखांची रोकड, महत्त्वाचे दस्तऐवज चोरून नेले. सचिन बबन अडसूळ यांनी तक्रारीवरून सीबीडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. रस्त्याच्या कडेला उभ्या वाहनांना लक्ष्य करून चोरी करणाऱ्या टोळीचा हा प्रकार असण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दरम्यान, शहरात काही दिवसांपासून पार्किंगमध्ये उभ्या गाड्यांमध्ये चोरीच्या घटना वाढल्या आहेत. वाहनात मौल्यवान वस्तू न ठेवण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# उरणमधील शेतकऱ्यांचा मत्स्यपालन व्यवसायाकडे कल



## शेततळे योजना ठरतेय समृद्धीचा मार्ग

**उरण : प्रतिनिधी**

उरणमधील शेतकरी आता वाडवडिलोपार्जित शेत जमिनी वाचविण्यासाठी आणि त्यातून आर्थिक कमाईसाठी जमिनी भुई भाड्याने देणे, फळफुलावळ, बागायती शेती, मत्स्यपालन आदी व्यवसायांकडे वळू लागले आहेत. मत्स्यपालन व्यवसायाला शासनाकडूनही आर्थिक अनुदानाची जोड मिळत असल्याने युवा पिढी वर्षाकाठी पाच लाख रुपयांचे उत्पन्न मिळत असलेल्या 'मागेल त्याला शेततळे' या योजनेचा लाभ घेऊ लागले आहेत. यावर्षी मत्स्यपालन व्यवसायाकडे वळणाऱ्या आणखी १५ शेतकऱ्यांमध्ये वाढ झाली असल्याचे उरण तालुका कृषी अधिकारी अक्षय राठोड यांनी सांगितले.

उरण तालुक्यातील शेतकऱ्यांनी जमिनींची विक्री करण्याऐवजी वडिलोपार्जित शेतजमिनी वाचविणे,तीचा वापर करून अधिकाधीक आर्थिक उत्पन्न मिळविण्यासाठी येथील शेतकऱ्यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. यासाठी येथील काही सामाजिक संघटनांनी जनजागृतीही सुरू केली आहे.या जनजागृतीचा शेतकऱ्यांवर चांगल्या प्रकारे परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.

शेतकऱ्यांनी जमिनी विक्री न करता भुई भाड्याने देण्याचा मार्ग अवलंबला आहे. तर अनेक शेतकऱ्यांनी शेती, बागायती, भाजीपाला, फळफळावळांची लागवड करून आर्थिक कमाई वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. यामध्ये आता नव्याने मत्स्य पालन व्यवसायाची भर पडली आहे. यासाठी शासनाचीही मदत मिळत असल्याने उरणमध्ये मत्स्य पालन व्यावसायिक शेतकऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. मागील वर्षी ६ शेतकऱ्यांनी मत्स्य पालन व्यवसायाला पसंती दिली होती. यावर्षात मत्स्यपालन व्यवसायाकडे कल वाढलेल्या शेतकऱ्यांची संख्या १५ हुन अधिक वाढली आहे. विशेष म्हणजे यामध्ये युवा पिढीच्या व्यावसायिक शेतकऱ्यांची संख्या अधिक आहे. यासाठी शेतकऱ्यांना शेततळे योजनेद्वारे ७६ हजार रुपये अनुदानही दिले जात आहे. फक्त यासाठी स्वमालकीची जमीन असणे आवश्यक आहे.

वेळप्रसंगी या मत्स्य पालन व्यवसायासाठी खोदलेल्या खड्ड्यातील पाणी पिकांना पाणी देऊन संभाव्य नुकसान टाळता येते. पाण्याची सोय झाल्यामुळे शेतकरी वर्षातून दोन पिके घेऊ शकतात. ज्यामुळे त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढते. अनेक शेतकरी शेततळ्यामध्ये मत्स्यपालनाचा जोडधंदा करून अतिरिक्त उत्पन्न मिळवत आहेत, असल्याची माहिती उरण तालुका कृषी अधिकारी अक्षय राठोड यांनी दिली.

मत्स्यपालनाच्या जोडधंदा किफायतशीर ठरत आहे. यातुन वर्षाकाठी पाच लाखांपर्यंत आर्थिक उत्पन्न मिळत असल्याने याकडे विशेषता तरुणांचा वाढला असल्याचे शेतकरी सचिन गावंड यांनी सांगितले. तर उरण परिसरात शासनाच्या निकषानुसार आवरे येथील शेतकरी लक्ष्मण भगत यांनी शेततळे तयार करून युवा पिढीच्या मत्स्यपालन करू पाहाणाऱ्या व्यासायिकांसाठी नवा आदर्श समोर ठेवला आहे.

# यंदाही साजरा होणार सहा दिवसांचा भव्य भीमोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दरवर्षीप्रमाणे यंदाही सहा दिवसांचा भिमोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असल्याची माहिती भाजपचे रायगड जिल्हा सरचिटणीस व पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेता ॲड. प्रकाश बिनेदार यांनी दिली आहे.

भारतीय जनता पक्ष नवीन पनवेल आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती नवीन पनवेल व आठ सामाजिक संस्था यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सहा दिवसांचा भव्य जयंती भीमोत्सव १० एप्रिल ते १५ एप्रिलपर्यंत उत्साहात साजरा करण्यात येणार येणार आहे. या महोत्सवामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन, विविध सामाजिक व प्रबोधनात्मक कार्यक्रम तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, असे ॲड. प्रकाश बिनेदार यांनी सांगितले.

या महोत्सवाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, माजी सभागृहनेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, आयुक्त मंगेश चितळे, उपमहापौर प्रमिला पाटील, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी शहर अध्यक्ष अनिल भगत, बिल्डर ॲण्ड डेव्हलपर्सचे श्रीपाद भांडारी, स्थायी समितीचे सभापती बबन मुकादम, महिला व बाल कल्याण सभापती ममता म्हात्रे, ज्येष्ठ नेते



जगदीश घरत, भारतीय बौद्ध महासभेचे प्रदेश अध्यक्ष महेंद्र मोरे, नगरसेवक दशरथ म्हात्रे, सुमित झुंझारराव, कामगार नेते अनिल जाधव, अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अकबर सय्यद यांच्यासह लोकप्रतिनिधी अनेक मान्यवर उपस्थित राहणार असल्याचेही ॲड. प्रकाश बिनेदार यांनी सांगितले.

त्या अनुषंगाने १० एप्रिल ते १३ एप्रिल दरम्यान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा, विविध मैदानी खेळांच्या स्पर्धा, महिलांसाठी संगीत खुर्ची, खेळ पैठणीचा तसेच ज्येष्ठ माता-पित्यांचा सन्मान सोहळा इत्यादि स्पर्धात्मक आणि सन्माननीय कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. जयंतीच्या दिवशी म्हणजेच मंगळवार दिनांक १४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता धम्म ध्वजारोहण, १०.३० वाजता सुप्रसिध्द प्रवचनकार, भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षक आयु. कल्पेश कांबळे यांचे धम्म प्रवचन आणि स्नेहभोजनाचा कार्यक्रम बुध्दगया प्रतिष्ठान अंतर्गत नवीन पनवेल येथील बिनेदार कॉर्नर जवळील आम्रपाली बुध्द विहार येथे होणार आहे. तसेच त्याचदिवशी सायंकाळी ०६ वाजता महाराष्ट्राचे ख्यातनाम गायक आनंद शिंदे यांचा 'शिंदेशाही बाणा' हा भीमगीतांचा बहारदार कार्यक्रम तर बुधवार दिनांक १५ एप्रिल रोजी सायंकाळी ०६ वाजता महाराष्ट्राचे सुप्रसिध्द गायक जोडी साजन-विशाल यांचा भीमगीतांचा भरगच्च कार्यक्रम सिडको क्रिडांगण, बिनेदार मैदान, जय अंबे माता मंदिराशेजारी, सेक्टर २, नवीन पनवेल.(पूर्व) या ठिकाणी आयोजित होणार आहे. या उपक्रमात नागरिकांचा, विविध सामाजिक संघटनांचा तसेच युवकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग अपेक्षित आहे.

नवीन पनवेल परिसरात दरवर्षीप्रमाणे यंदाही हा भीमोत्सव मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा होणार असून संपूर्ण परिसरात उत्सवी वातावरण निर्माण होणार आहे, असेही त्यांनी नमूद करतानाच या भीमोत्सवाला सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन या महोत्सवाचे आयोजक व पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेता ॲड. प्रकाश बिनेदार यांनी केले आहे.

# पनवेल तालुक्यात ११३ शाळा आरटीई कक्षेत

**पनवेल : वार्ताहर**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी आरटीई 25 टक्के ऑनलाइन प्रवेशाची सोडत जाहीर झाली आहे. गटशिक्षणाधिकारी पनवेल पंचायत समिती या ठिकाणी निवडलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेश निश्चिती प्रक्रिया ११ ते २० एप्रिलदरम्यान कागदपत्रांची पडताळणी करून करणार आहेत.

पनवेल तालुक्यात यंदा २६३१ विद्यार्थी आरटीईच्या कक्षेत आहेत. रीतसर ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर विद्यार्थ्यांच्या पालकांना एसएमएस प्राप्त होण्यास सुरुवात झाली आहे. ज्यांना एसएमएस आले नाहीत त्यांना https://student.maharashtra.gov .in/adm_portal/Users/rte_index_ घेता येणार आहे. new या लिंकवर आरटीईची माहिती आरटीईची प्रवेशाची कक्षा १ किमी वाढवून त्यानंतर ३ किमी करण्यात आली होती. मात्र, अनेकांनी अर्ज भरताना केवळ एक किमी अंतराची शाळा अर्जात नमूद केल्याने या प्रक्रियेत काही प्रमाणात गोंधळ निर्माण झाला होता. आरटीईची प्रक्रिया सुरू झाल्याने पुढील काळात पालकांची कागदपत्रांची जुळवाजुळव आणि शिक्षणाधिकाऱ्यांकडे वेळ त्याची पूर्तता करण्यात जाणार आहे. आरटीईच्या कक्षेतील विद्यार्थ्यांना अशा खासगी शाळांमध्ये वेगळी वागणूक दिली जात असल्याचा आरोप पालक करीत आले आहेत. शासनाने अशा शाळांवर लक्ष ठेवण्याची गरज आहे. अनेक शाळांमध्ये आरटीईच्या विद्यार्थ्यांच्या वेगळ्या तुकड्या बनविल्या आहेत.

**लॉटरीमधील विद्यार्थ्यांचे कागदपत्र तपासून आरटीई अंतर्गत ज्या शाळेत ॲडमिशन होणार आहे त्या शाळांना आमच्यामार्फत सूचित केले जाईल. २० एप्रिलपर्यंत ही प्रक्रिया चालेल.**

**-साहू सतपाल, गट शिक्षणाधिकारी, पनवेल**

**आरटीई प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुस्तके, गणवेश देण्याची जबाबदारी शाळेची असते, मात्र गणवेश आणि पुस्तकांच्या नावाने तब्बल १५ ते २० हजार रुपये या विद्यार्थ्यांच्या पालकांकडून आकारण्यात येतात. ते थांबायला हवे.**

**-चेतन वाघ, सामाजिक कार्यकर्ते**

# गव्हाण पंचक्रोशीत शांतादेवीची यात्रा उत्साहात

## मान्यवरांची लाभली उपस्थिती







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण पंचक्रोशीतील शांतादेवीच्या यात्रेला शनिवारी सुरुवात झाली. शेकडो वर्षांची परंपरा लाभलेल्या या यात्रेसाठी परिसरातील तसेच दूरवरूनही भाविक मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. दोन दिवस चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला आहे.

यात्रेच्या पहिल्या दिवशी विविध धार्मिक विधी, पूजा-अर्चा आणि पारंपरिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. देवीच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच भाविकांची रांग लागल्याचे पाहायला मिळाले. ग्रामस्थांनी यात्रेच्या निमित्ताने विविध सोयीसुविधांची व्यवस्था केली असून, शिस्तबद्ध नियोजनामुळे भाविकांना दर्शन घेणे सुलभ झाले आहे.

दरम्यान, शनिवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शांतादेवीचे मनोभावे दर्शन घेतले.

यावेळी त्यांनी भाविकांशी संवाद साधत यात्रेच्या आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. या वेळी ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, शकुंतला रामशेठ ठाकूर, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, जयवंत देशमुख, विश्वनाथ कोळी, माजी उपसरपंच विजय घरत, संजय भगत, जगदीश घरत, नगरसेविका डॉ. अस्मिता घरत, सुहास भगत आदी उपस्थित होते. दरम्यान, यात्रेतील पाळण्यांचे उद्घाटन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले.







**पनवेल : रायगड प्रेस क्लबच्या पुरस्काराने सन्मान झाल्याबद्दल दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पत्रकार हरेश साठे यांचे कौतुक करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. तसेच वाढदिवसाच्याही शुभेच्छा देऊन आशीर्वाद दिले. भाजप नेते सुप्रसिद्ध सनदी लेखापाल माजी खासदार किरीट सोमेय्या, भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार यांच्यासह पत्रकार मित्र आणि हितचिंतकांनी हरेश साठे यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन केले.**

**पनवेल : भाजप प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर हे केरळमधील कासरगोड विधानसभा निवडणुकीतील भाजप प्रचारासाठी केरळीय पनवेल रहिवासी भाजप कार्यकर्ते यांच्या समवेत सुमारे तीन आठवडे फिरले. त्या निमित्ताने आमदार प्रशांत ठाकूर यांचा श्री अय्यप्पा सेवा संघम ट्रस्टींच्या वतीने श्री रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ सभागृहात सत्कार करण्यात आला. या वेळी श्री अय्यप्पा सेवा संगमचे अध्यक्ष अजितकुमार के.बी, उपाध्यक्ष बिनू थँकप्पन, श्री नारायण चैतन्य ट्रस्टचे सचिव जयचंद्रन के वासू, गिरीश, सुनील कुमार, राघवन, हरिदास पिल्लई आदी उपस्थित होते.**



# पनवेलमध्ये जळालेल्या अवस्थेत आढळला महिलेचा मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील वाकडी ते चिंचवली कडे जाणाऱ्या रस्त्याच्या आतमध्ये एका महिलेचा मृतदेह जळालेल्या अवस्थेत सापडला आहे. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस अधिक तपास करीत आहेत.

तालुक्यातील वाकडी ते चिंचवली गावाच्या हद्दीत वन विभागाच्या जागेत एका महिलेचा मृतदेह जळालेला अवस्थेत असल्याची माहिती तालुका पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर पनवेल तालुका पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पनवेलचे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले, गुन्हे शाखेच्या सहाय्यक पोलीस आयुक्त प्रेरणा कट्टे यांनी देखील रात्रीच्या वेळेस घटनास्थळी जाऊन पाहणी केली. फॉरेन्सिक व्हॅनदेखील घटनास्थळी दाखल झाली.

यावेळी मुख्य रस्त्यापासून जवळपास दीडशे ते दोनशे फूट अंतरावर वनविभागाच्या जागेत एका महिलेचा मृतदेह जळालेल्या अवस्थेत दिसून आला. या महिलेची ओळख पटलेली नाही. या महिलेला बाहेरून मारून या ठिकाणी आणून टाकले की याच ठिकाणी तिची हत्या केली आणि तिला जाळण्याचा प्रयत्न केला याचा तपास पोलीस करत आहेत. दरम्यान या महिलेची ओळख पटल्यानंतर तिची हत्या कोणी, कशासाठी आणि कशी केली हे समजणार आहे.

# पनवेलमध्ये रक्तदान आणि आरोग्य शिबिराला प्रतिसाद

**कळंबोली : बातमीदार**

श्री प्रल्हाद राय झुलेलाल ट्रस्ट, श्री पूज्य सिंधी पंचायत ट्रस्ट, विद्यार्थी वाहक संस्था, पनवेल तालुका पत्रकार विकास मंच आणि अन्य सेवाभावी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने रविवार १२ एप्रिल रोजी रक्तदान शिबिर आणि मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन भाई पाटील यांच्या शुभहस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. येथील श्रीपूज्य सिंधी पंचायत झुलेलाल मंदिर या ठिकाणी संपन्न झालेल्या शिबिराचा शेकडो रुग्णांनी लाभ घेतला तर ८७ दात्यांनी रक्त दिले. शिबिरा करता १०९ रक्तदात्यांनी नोंदणी केलेली होती परंतु वैद्यकीय तांत्रिक कारणांमुळे २२ रक्तदात्यांचे रक्त नाकारले गेले.

मुख्य आयोजक ॲड. मनोहर सचदेव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केले जाणारे हे तिसावे रक्तदान शिबिर होते. विनामूल्य आरोग्य तपासणी शिबिरदेखील झाले. ब्लडप्रेशर, ब्लड शुगर, यांच्या तपासणी बरोबरच ईसीजी सेवा संपूर्णपणे विनामूल्य प्रदान करण्यात येत होत्या.

## संपादकीय

# सभ्य राजकीय संस्कृती

दिल्लीतील संसदेच्या आवारातील प्रेरणा स्थळ येथे शनिवारी घडलेला दुर्मिळ प्रसंग भारतीय लोकशाहीच्या सुदृढ परंपरेचा आणि सभ्य राजकारणाचा आशादायी नमुना म्हणून पाहिला जावा. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि विरोधी पक्षनेते यांच्यातील नम्र नमस्ते, त्यानंतर झालेला संवाद आणि परस्पर आदराची झलक ही केवळ औपचारिक घटना नसून भारतीय राजकारणातील सकारात्मकतेची नवी दिशा दर्शवणारी ठरते.

**भारतीय राजकीय क्षेत्रातील दोन बड्या नेत्यांची ही भेट महात्मा फुले यांच्या स्मृतीस्थळी घडली हे विशेष महत्त्वाचे आहे. फुले यांनी आयुष्यभर समाजातील विषमता दूर करण्यासाठी, शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी आणि मानवी मूल्ये जोपासण्यासाठी काम केले. त्यांच्या विचारांचा गाभा हा संवाद, समता आणि सहकार्य यांवर आधारलेला होता. अशा महान समाजसुधारकाला अभिवादन करताना देशातील प्रमुख राजकीय नेते एकत्र येणे हे त्यांच्या विचारांना खरी आदरांजली ठरते. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी ज्येष्ठ काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्या प्रकृतीची विचारपूस केली हा एक अत्यंत मानवी आणि संवेदनशील क्षण होता. राजकीय मतभेदांच्या पलीकडे जाऊन एकमेकांची विचारपूस करणे ही भारतीय संस्कृतीची ओळख आहे. या कृतीमुळे राजकारणातील कटुता कमी करून संवादाचे पूल बांधण्याची गरज अधोरेखित होते. या कार्यक्रमाला लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला, आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा, कायदामंत्री अर्जुन राम मेघवाल यांसारखे अनेक मान्यवर उपस्थित होते तसेच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांच्या स्वागतासाठी सर्व नेते एकत्र उभे राहिले. हा प्रसंग भारतीय लोकशाहीतील एकात्मतेचा आणि परस्पर सन्मानाचा जिवंत नमुना ठरला. भारतीय लोकशाहीची खरी ताकद ही विविधतेत आहे. वेगवेगळ्या विचारसरणी, भिन्न राजकीय भूमिका आणि मतभेद असूनही एकमेकांचा सन्मान राखणे हीच आपली परंपरा आहे. मोदी आणि गांधी यांच्यातील संवादाने हेच अधोरेखित केले की मतभेद असले तरी मनभेद असण्याची गरज नाही. ही भावना लोकशाहीला अधिक परिपक्व आणि समृद्ध बनवते. आजच्या काळात राजकारण अनेकदा संघर्ष, आरोप-प्रत्यारोप आणि तणाव यांभोवती फिरताना दिसते. अशा वेळी अशा सकारात्मक आणि सौहार्दपूर्ण क्षणांची समाजाला नितांत गरज असते, कारण हे क्षण केवळ नेत्यांपुरते मर्यादित राहत नाहीत, तर समाजालाही एक महत्त्वाचा संदेश देतातसंवादातूनच मार्ग निघतो. या घटनेमुळे राजकीय क्षेत्रात अधिक सुसंवाद, सहकार्य आणि समन्वय वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. संसद ही केवळ वादविवादांची जागा नसून देशाच्या प्रगतीसाठी सामूहिक निर्णय घेण्याचे व्यासपीठ आहे. अशा सकारात्मक संवादांमुळे संसद अधिक परिणामकारक होऊ शकते. शेवटी प्रेरणा स्थळावरील हा प्रसंग भारतीय लोकशाहीसाठी प्रेरणादायी ठरतो. तो सांगतो की राजकारणात मतभेद असले तरी आदर, संवेदनशीलता आणि संवाद यांना कधीही विसरता कामा नये. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखवलेला हा सकारात्मक दृष्टिकोन भविष्यातील राजकारणासाठी मार्गदर्शक ठरू शकतो. अशा क्षणांमुळे लोकशाही अधिक मजबूत होते, समाजात विश्वास वाढतो आणि राष्ट्र एकात्मतेकडे वाटचाल करते. त्यामुळे या घटनेचे स्वागत करून त्यातून प्रेरणा घेणे हीच खरी पुढची पायरी ठरेल.**

# कर्जत रेल्वेस्थानकात प्रवाशांना सुविधा मिळाव्यात





**खबरबात**
**विजय मांडे**

कोरोनाच्या काळात कर्जत रेल्वेस्थानाकावर ज्या लांब पल्यांच्या गाड्यांचे थांबे बंद केले. ते थांबे पुन्हा सुरु व्हावेत. यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. अगदी तत्कालीन केंद्रिय रेल्वे राज्य मंत्री रावसाहेब दानवे, केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची सुद्‌धा भेट घेतली. खासदारांनी सुद्‌धा त्यासाठी प्रयत्न केला. तरीही एक सुद्‌धा गाडीचा थांबा सुरु झाला नाही. त्यामुळे रेल्वे सेवा नक्की प्रवाशांसाठी आहे ना? असा प्रश्न उपस्थित होत आहे. गेल्या आठ - दहा दिवसांपासून पुन्हा हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बहुतांश कर्जतकर प्रवाशांनी साधे सनदशीर मार्गाने आंदोलन करून हा थांब्यांचा प्रश्न सुटणार नाही. म्हणून रेल रोको केला तर चुटकी सरशी हा प्रश्न सुटेल. अशा भावना व्यक्त केल्या.

पाच - सहा वर्षापूर्वी कोविडच संकट जगभर आले. त्यावेळी अनेक महिने सारे काही ठप्प झाले होते. दळण वळणाची सुविधा पूर्णपणे बंद करण्यात आली होती. रस्त्यावर चिटपाखरू सुद्‌धा फिरत नव्हते. त्यावेळी लांब पल्यांच्या गाड्यांचे थांबे बंद करण्यात आले होते. या गोष्टीला सहा वर्षे झाली. पुण्याहून सकाळी पावणे आठ वाजता सुटणारी प्रगती एक्सप्रेस गाडी नंतर एकदम साडे तीन वाजता सुटणारी डेक्कन एक्सप्रेस ही गाडी कर्जतकर प्रवाशांसाठी आहे. म्हणजे सुमारे साडे सात - आठ तास पुण्याहून कर्जतला यायला गाडी नाही. एखाद्याला यायचेच असेल तर एखाद्या एक्सप्रेसने किंवा लोकलने लोणावळ्यापर्यंत यायचे आणि तेथून बसने किंवा खाजगी टॅक्सीने खोपोलीला यायचे मग मिळेल त्या लोकलने कर्जतला यायचा असा द्राविडी प्राणायाम करावा लागतो. हा प्रवास जेष्ठ नागरिक, अपंग किंवा महिलांना झेपत नाही. त्यामुळे ते तासन तास पुणे किंवा लोणावळा स्टेशनवर ताटकळत बसतात.

पूर्वी कर्जतला पुणे - भुसावळ आणि पुणे - कर्जत आणि नंतर पुणे - पनवेल ही पॅसेंजर गाडी होती. ती बंद करण्यात आली. त्यामुळे गरीब प्रवाशांना आर्थिक भुर्दंड होत असतो. शिवाय जागा मिळविण्यासाठी हाजी हाजी तर कधी वाद करावा लागतो. कर्जतला कोरोना पूर्वी थांबा असलेल्या गाड्या थांबवाव्यात यासाठी कर्जत रेल्वे पॅसेंजर असोशिएशन, सामाजिक कार्यकर्ते, झेडआरयुसीसी सदस्य, भारतीय जनता पार्टीचे शिष्ठामंडळ, काही समूह प्रयत्न करीत आहेत. त्यांनी अगदी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट देखील अनेकांनी घेऊन याबाबत निवेदने दिली. खासदार श्रीरंग बारणे यांनीही रेल्वे मंत्र्यांची भेट घेऊन याबाबत चर्चा केली. इतकेच नव्हे तर रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनीही रेल्वे मंत्र्यांची भेट घेऊन चर्चा केली. परंतु त्यांनाही अद्याप यश आले नाही.

कर्जत नगरपरिषदेची निवडणूक होती त्यावेळी जाहीर प्रचार सभेत खासदार सुनील तटकरे यांनी लांब पल्यांच्या गाडयांना थांबा मिळवून देण्याचा जाहीर 'शब्द' दिला होता. त्यांनी त्यांच्या रोह्याला कोणतेही आंदोलन न करता अनेक गाडयांना थांबेल दिले आहेत. त्यामुळे ते थांबा मिळवून देतील. अशी खात्री त्यावेळी कर्जतकरांना होती. मात्र त्या गोष्टीला आता चार महिने होऊन गेले. अखेर कर्जतकरांनी थांबे मिळविण्यासाठी रणशिंग फुंकले आणि गेल्या रविवारी श्री शनि मंदिरातील रवी किरण सभागृहात एक विशेष बैठक लावली. त्यामध्ये अनेकांनी सटर फटर आंदोलने करून काहीही होणार नाही. दिवा वासियांनी रेल रोको केला त्यामुळे त्यांना अनेक लोकलचे थांबे मिळाले. लोणावळ्याच्या प्रवाशांनी रेल रोको केला त्यावेळी त्यांनाही गाड्यांचे थांबे मिळाले. कर्जतकरांनीही रेल रोको करावा. या निर्णयावर उपस्थित सारे जण आले. रेल रोको केल्यानंतर त्यांनी भरलेल्या खटल्यांसाठी हेलपाटे मारावे लागतात. हे खटले दहा - वीस वर्षे चालतात. ही कल्पना असूनही काही जण रेल रोको करण्यासाठी स्वतः हून तयार झाले. सर्वात महत्वाचे म्हणजे रेल्वे पॅसेंजर असोसिएशनच्या एका बहात्तर वर्षीय माजी पदाधिकाऱ्याने या आंदोलनात माझा बळी गेला तरी बेहत्तर मी त्यासाठी सर्वात पुढे असेन. त्यानंतर अनेकांनी आपली दाखविली. बहुतेक येत्या काही दिवसात रेल रोकोची तारीख ठरून ऐतिहासिक रेल रोको होईल. अशी परिस्थिती निर्मा झाली आहे.

कोरोना पूर्वीचे थांबे मिळावेत म्हणून कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशनच्या माध्यमातून सह्यांची मोहीम सुरु आहे. हजारो प्रवाशांनी सह्या केल्या आहेत. या मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. परंतु रेल्वे प्रशासन गांभीर्य दाखवेल काय? हा प्रश्न उपस्थित होत आहे. 'त्यांना बाप दाखव नाहीतर श्राद्‌ध कर' ही भाषा समजते. त्यामुळे रेल रोको झाला तरच थांबे पदरात पडतील. अशी सर्वांची अपेक्षा झाली आहे. थांबे मिळावेत म्हणून कुणी ट्विट करतात. तर कुणी आपल्या परीने निवेदने देऊन प्रयत्न करतात. तर कुणी केंद्रीय राज्यमंत्र्यांना भेटतात. सर्व जण थांबे मिळविण्यासाठी काहीना काही करीत आहेत. मात्र रेल रोको केल्यास नक्की गाडयांना थांबा मिळेल. असे अनेकांचे मत आहे. असो. त्यांना यश येवो. याच सदिच्छा...

# जीवाणू शास्त्रज्ञ वसंत खानोलकर

वसंत रामजी खानोलकर यांचा आज जन्मदिन. त्यांनी भारतातील आधुनिक वैद्यकशास्त्राचा पाया घातला. ते प्रसिद्‌ध जीवाणू शास्त्रज्ञ होते. देशाच्या निरनिराळ्या प्रांतातील लोकांच्या आहाराच्या व इतर सवयी तसेच तेथील कर्करोगाचे प्रमाण यांचा संबंध तपासण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यांचा जन्म १३ एप्रिल १८९५ कोकणातील एका छोट्या खेडेगावात एका गोमंतक मराठा समाजातील सुशिक्षित कुटुंबात झाला.

वयाच्या १७ व्या वर्षी त्यांनी मुंबईच्या ग्रान्ट मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्याच वर्षी ते इंग्लंडला रवाना झाले. लंडन विद्यापीठातून त्यांनी विज्ञान शाखेची पदवी संपादन केली आणि १९१८ मध्ये वैद्यकीय पदवी मिळवली. १९२३ मध्ये ते रोगनिदानशास्त्रात (पॅथॉलॉजी) एम.डी. झाले. या काळात त्यांनी मूलभूत विज्ञान आणि वैद्यकीय संशोधनात अमूल्य अनुभव मिळवला. ते सर्वात कमी वयाचे ग्रॅहम रिसर्च स्कॉलर होते.कर्करोग आणि कुष्ठरोग यावर त्यांनी तीन पुस्तके आणि शंभरहून जास्त शोधनिबंध प्रकाशित केली आहेत. या सर्वेक्षणातूनच तंबाखू, पान आणि सुपारी सतत चघळणे आणि तोंडाचा कर्करोग यांचा निकटचा संबंध त्यांच्या ध्यानात आला. इंडियन कॅन्सर रिसर्च सेन्टर या संस्थेची स्थापनाही त्यांनी केली. कुष्ठरोगाविषयीही त्यांनी मूलभूत संशोधन केले. त्यातूनच कुष्ठरोगास कारणीभूत ठरणारा आणि प्रयोगशाळेत ज्याची वाढ केली जाऊ शकते अशा एका जीवाणूचा शोध त्यांना लागला. अशा या प्रसिद्‌ध शास्त्रज्ञाचे २९ ऑक्टोबर १९७८ रोजी निधन आले. (साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# गुगलने लाँच केले 'एआय एज गॅलरी' ॲप

आतापर्यंत आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्लाउड, सर्व्हर आणि सतत इंटरनेट कनेक्शनशिवाय चालत नव्हते. पण हा ट्रेंड आता बदलू लागला आहे. गुगलने AI Edge Gallery नावाचे असे ॲप सादर केले आहे, जे AI ला थेट स्मार्टफोनमध्ये आणते. म्हणजे, वापरकर्ता आपल्या



फोनवरच गामा-४ सारखे मॉडेल चालवू शकतो, तेही इंटरनेटशिवाय. हा बदल केवळ एक नवीन ॲप नाही, तर AI च्या वापराची पद्‌धत बदलणारे पाऊल आहे.

आतापर्यंत जेव्हाही वापरकर्ता कोणताही प्रश्न विचारायचा, फोटो समजून घ्यायला सांगायचा किंवा ऑडिओ ट्रान्सक्राइब करायचा, तेव्हा संपूर्ण डेटा इंटरनेटद्‌वारे क्लाउड सर्व्हरपर्यंत जायचा. नंतर निकाल परत फोनवर यायचा. आता AI चे काम थेट तुमच्या फोनवर किंवा डिव्हाइसवरच होऊ लागले आहे. फोटो ओळखणे, आवाज समजून घेणे, मजकूर प्रक्रिया करणे... सर्व काही स्थानिक डिव्हाइसवर साठवले जाते. तुमचा डेटा सर्व्हरवर पाठवण्याची गरज संपते. इंटरनेट नसतानाही याची जवळपास सर्व वैशिष्ट्ये काम करतील.या पद्‌धतीने ॲक्टिव्हेट करा

- प्ले स्टोअर किंवा ॲप स्टोअरवरून AI Edge Gallery डाउनलोड करा.
- फोनच्या क्षमतेनुसार गामा मॉडेल निवडा. येथे २ ते ४ जीबीची आवृत्ती डाउनलोड करावी लागेल, म्हणजेच फोनमध्ये इतकी स्टोरेज शिल्लक असावी.
- यानंतर यात चार मोड्स आहेत. टेक्स्टपासून इमेजपर्यंत... त्यांचा वापर करा.


प्रायव्हसीपासून ४ मोड्सपर्यंत; युजर्सना हे फायदे

फायदा - दुर्गम भागातही एआय काम करेल

सर्वात मोठा फायदा प्रायव्हसी आणि ॲक्सेसचा आहे. एआय वापरताना तुमचा डेटा फोनमधून बाहेर जात नाही, त्यामुळे तुमची माहिती सुरक्षित राहते. तसेच, ऑफलाइन मोडमध्येही एआय काम करते, ज्यामुळे इंटरनेट नसलेल्या भागातही त्याचा वापर शक्य आहे.

तंत्रज्ञान - नवीन प्रोसेसरवर ॲप अधिक चांगले काम करेल हे ॲप आणि त्याचे मॉडेल फोनच्या एनपीयू (न्यूरल प्रोसेसिंग युनिट) चा वापर करतात. हे सर्व फोनवर चालू शकते.

# अभिनेते, दिग्दर्शक, निर्माता सतीश कौशिक



**निमित्त**

अभिनेते, दिग्दर्शक, निर्माता सतीश कौशिक यांचा आज जन्मदिन आहे. सतीश कौशिक यांनी आतापर्यंत अनेक हिंदी चित्रपटात महत्वाच्या भूमिका निभावल्या आहेत. एक अभिनेता म्हणून ते, मिस्टर इंडिया मधील कॅलेंडर, दीवाना मस्ताना मधील पप्पू पेजर आणि सारा गॅवरॉनच्या ब्रिक लेनमधील चानू अहमद या भूमिकेसाठी प्रसिद्‌ध आहेत. त्यांना दोनदा फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेता म्हणून पुरस्कार मिळाला आहे. आज आपण सतीश कौशिक यांचा संपूर्ण प्रवास येथे जाणून घेणार आहोत.

सतीशचंद्र कौशिक यांचा जन्म १३ एप्रिल १९५६ रोजी झाला. धनौंडा, महेंद्रगड जिल्हा, पूर्व पंजाब हे त्यांचे होमटाऊन आहे. सतीश हे नवीवाला गली, करोलबाग, दिल्ली येथे लहानाचे मोठे झाले, त्यानंतर पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर ते पुण्यात आले आणि त्यांनी फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियामध्ये प्रवेश घेतला. सतीश यांनी किरोरी माल कॉलेज, नवी दिल्ली येथून पदवी शिक्षण घेतले. नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा, नवी दिल्ली येथून त्यांनी अभिनयाचे धडे घेतले. सतीश यांनी शशी यांच्याशी लग्न केले. त्यांना वनिष्का ही मुलगी आहे.

सतिश कौशिक यांनी १९८३ मध्ये आलेल्या मासूम चित्रपटापासून अभिनयात पदार्पण केले. या चित्रपटात तनुजा, सुप्रिया पाठक आणि सईद जाफरी यांच्यासह नसीरुद्दीन शाह आणि शबाना आझमी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. यात जुगल हंसराज, आराधना आणि उर्मिला मातोंडकर बाल कलाकाराच्या भूमिकेत आहेत.

अनिल कपूर आणि श्रीदेवी यांच्यासोबत मिस्टर इंडिया या हिट चित्रपटातील कॅलेंडर या भूमिकेसाठी ते प्रसिद्‌ध आहे. त्यांचा मित्र डेव्हिड धवन दिग्दर्शित कॉमेडी चित्रपट (१९९७) मधील दीवाना मस्ताना मधील पप्पू पेजर या भूमिकेसाठी ते प्रसिद्‌ध आहेत. २०१६ च्या उडता पंजाब या चित्रपटात तायाजीची भूमिका त्यांनी साकारली होती. १९८९मध्ये राम लखन (काशीराम) १९९६ च्या साजन चले ससुरालमध्ये (मुथ्थू स्वामी), १९९७ मिस्टर आणि मिसेस खिलाडीमध्ये चंदा मामा, १९९८ परदेसी बाबू (हरपाल 'हॅपी' सिंग), बडे मियाँ छोटे मियाँ (शराफत अली), घरवाली बहारवाली (जंबो), छोटा चेतन (प्रोफेसर चश्मीश), १९९९ हसिना मान जायेगी, आ अब लौट चलें (चौरसिया),बडे दिलवाला (पोलिस निरीक्षक इकबाल शेख),हम आपके दिल में रहते हैं (जर्मन), हद कर दी आपने (प्रकाश चौधरी), दुल्हन हम ले जायेंगे (हसत इन्स्पेक्टर), २००१ क्यो की... मैं झुठ नहीं बोलता (मोहन) दिग्दर्शक म्हणून त्यांचा पहिला चित्रपट१९९३चा श्रीदेवीचा रूप की रानी चोरों का राजा हा होता. दुसरा १९९५मध्ये प्रेम हा तब्बूचा पहिला चित्रपट होता. दोन्ही बॉक्स ऑफिसवर फारसे हिट झाले नाही. १९९९ मध्ये 'हम आपके दिल में रहते हैं' या चित्रपटाने पहिला हिट चित्रपट मिळवला. त्यांनी फिलिप्स टॉप टेन या टीव्ही काउंटडाउन शोचे सह-लेखन आणि अँकरिंग केले आहे. यासाठी त्यांना स्क्रीन व्हिडिओकॉन पुरस्कार देखील मिळाला. नवाब जंग बहादूर या कॉन्टिलो प्रॉडक्शनद्‌वारे निर्मित, द ग्रेट इंडियन फॅमिली ड्रामामध्ये मुख्य भूमिकेत ते होते. आता त्यांनी तेरे नाम या त्यांच्या हिट चित्रपटाचा सिक्वेल बनवण्याचा निर्णय घेतला आहे.

(साभार : इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# चुकीच्या स्किनकेअरमुळे वाढू शकतो एजिंगचा धोका

देशाच्या अनेक भागांमध्ये पारा वेगाने वाढत आहे. वाढत्या तापमान आणि उच्च यूव्ही इंडेक्समुळे त्वचेच्या नुकसानीच्या समस्याही वाढत आहेत. ज्यामुळे केवळ सनबर्नच नाही तर दीर्घकाळात त्वचेचा कर्करोग आणि अकाली वृद्‌धत्वाचा धोका वाढतो. उन्हाळ्यात त्वचेची काळजी घेणे ही केवळ सौंदर्याची गरज नसून, आरोग्याचा एक भाग आहे. उन्हाळ्यात त्वचेच्या काळजीसाठी ७ महत्त्वाच्या गोष्टी जाणून घ्या



१. वारंवार चेहरा धुवू नका-

घाम आणि चिकटपणा टाळण्यासाठी आपण दिवसातून अनेक वेळा चेहरा धुतो. जास्त स्वच्छता केल्याने त्वचेच्या अडथळ्याला (स्किन बॅरियर) नुकसान पोहोचते आणि` त्वचा कोरडी आणि संवेदनशील होते. म्हणून, दिवसातून फक्त २-३ वेळा सौम्य आणि सल्फेट-मुक्त फेस वॉशने चेहरा धुवा.

२. सनस्क्रीन नक्की लावा

इंडियन जर्नल ऑफ डर्मेटोलॉजीनुसार, दीर्घकाळ यूव्ही (UV) किरणांच्या संपर्कात राहिल्याने मेलाझ्मा, टॅनिंग, फोटोएजिंग आणि त्वचेच्या कर्करोगाचा धोका वाढतो. घरातून बाहेर पडण्यापूर्वी SPF ३०+ सनस्क्रीन लावा, दर २-३ तासांनी पुन्हा लावा आणि जेल-आधारित सनस्क्रीन निवडा.

३. जास्त उष्णतेत जेल-आधारित मॉइश्चरायझर निवडा, त्वचा हायड्रेटेड राहील .घाम आणि ऊन त्वचेला डिहायड्रेट करतात, ज्यामुळे त्वचा जास्त तेल तयार करते. म्हणून जेल-आधारित मॉइश्चरायझर आवश्यक आहे.

४. घाम आणि बुरशीजन्य संसर्ग

उन्हाळ्यात बुरशीजन्य संसर्गाचा धोका वाढतो. यापासून वाचण्यासाठी सैल सुती कपडे घाला, जास्त घाम आल्यास कपडे बदला आणि गरज असल्यास अँटी-फंगल पावडर/क्रीम वापरा.

५. पाण्याची कमतरता म्हणजे निस्तेज त्वचा

पाण्याच्या कमतरतेमुळे त्वचेची लवचिकता कमी होते आणि ती कोरडी दिसू लागते. या हंगामात ३ ते ३.५ लिटर पाणी प्या. नारळाचे पाणी, ताक आणि पाणीदार फळे देखील घ्या.

६. त्वचेवर मुरुम का येतात?

उन्हाळ्यात घाम, प्रदूषण, बॅक्टेरिया आणि चुकीच्या उत्पादनांमुळे मुरुम वाढतात. दिवसातून २ वेळा सौम्य क्लींजर, तेल-मुक्त/नॉन-कॉमेडोजेनिक मॉइश्चरायझर वापरा.

# नागाव बीचवर पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी ‘रोबो रक्षक’ तैनात

## चौपाट्यांवर आता राहणार रोबोटची नजर; बुडणाऱ्यांच्या बचावासाठी हायटेक यंत्रणा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

नागाव समुद्र किनाऱ्यावर पर्यटकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत सरपंच हर्षदा निखिल मयेकर यांच्या पुढाकारातून रोबोटिक वॉटर रेस्क्यू यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. बुडणाऱ्यांच्या बचावासाठी अत्याधुनिक ‘रोबो रक्षक’ आता नागाव बीचवर कार्यरत होणार असून हा निर्णय स्थानिक पातळीवर एक मोठा आणि दूरदृष्टीचा टप्पा मानला जात आहे.

कलेक्टर कार्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत रायगड जिल्ह्यासाठी आपत्ती विषयक विशेष कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात रायगड जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनचा सहभाग होता, तसेच नागाव, काशीद आणि श्रीवर्धन समुद्रकिनारा येथील ग्रामपंचायतींनाही निमंत्रित करण्यात आले होते. ग्रामपंचायतीपैकी फक्त नागांव ग्रामपंचायत प्रशिक्षणास हजर होते.

या प्रशिक्षणासाठी नागाव ग्रामपंचायतीकडून सरपंच हर्षदा निखिल मयेकर यांच्यासह कर्मचारी कल्पेश नायक, मनीश म्हात्रे, आशीष मानकर आणि विनेश नागवेकर उपस्थित होते. याशिवाय विविध पोलीस स्टेशनमधील अधिकारीही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कलेक्टर ऑफिस मार्फत मा.श्री.पाठक सर यांच्या अध्यक्षतेखाली प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला.

या कार्यशाळेत पूरपरिस्थिती, नदी किंवा समुद्रात वाहून जाण्याच्या घटना, धरण परिसरातील आपत्कालीन प्रसंग तसेच सर्पदंश यांसारख्या विविध संभाव्य आपत्तींच्या संदर्भात सखोल मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच फर्स्ट एड व सर्वसमावेशक आपत्कालीन किटमधील प्रत्येक घटकाचा उपयोग कसा करायचा याचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात



आले. सदरील किट सर्व पोलिस स्टेशन व निवडक ग्रामपंचायतीत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

प्रशिक्षणादरम्यान सरपंच हर्षदा निखिल मयेकर यांनी महत्त्वपूर्ण मागणी मांडली. सध्या तीन समुद्रकिनाऱ्यांसाठी तीन रोबोटिक लाइफसेव्हिंग क्राफ्ट उपलब्ध करून देण्यात येणार असून त्यामध्ये नागावचा समावेश आहे. याशिवाय आणखी १५ लाइफसेव्हिंग रोबोट्सची मागणी कलेक्टर कार्यालयामार्फत करण्यात आलेली आहे. यावेळी त्यांनी नमूद केले की, रोबोटिक यंत्रणा उपलब्ध करून देणे हे स्वागतार्ह असले तरी समुद्रकिनाऱ्यांवर कार्यरत असलेल्या पारंपरिक लाइफगार्ड्सची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. पूर्वी या लाइफगार्ड्सचे मानधन कलेक्टर कार्यालयामार्फत दिले जात होते; मात्र सध्याच्या परिस्थितीत सर्व खर्च ग्रामपंचायतींना करणे शक्य नसते. त्यामुळे किमान काही प्रमाणातआवश्यक लाइफगार्ड्सपैकी काहींचा खर्च कलेक्टर कार्यालयाने उचलावा आणि उर्वरित खर्च ग्रामपंचायतींनी करावाअशी मागणी त्यांनी केली.

समुद्रकिनाऱ्यावर भरतीदरम्यान उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितींमध्ये तात्काळ मदत पोहोचवण्यासाठी पूर्णतः स्वयंचलित रोबोटिक वॉटर क्राफ्ट अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. रिमोट कंट्रोलच्या साहाय्याने सहजपणे चालवता येणारे हे यंत्र पाण्यात अडकलेल्या व्यक्तींपर्यंत वेगाने पोहोचून त्यांना सुरक्षित किनाऱ्यावर आणण्यास सक्षम आहे.

या यंत्रणेला National Disaster Response Force (NDRF) तसेच नेव्हीच्या मानकांनुसार मान्यता मिळालेली असून सर्व आवश्यक चाचण्या पूर्ण करण्यात आल्या आहेत.

सरपंच हर्षदा निखिल मयेकर यांनी स्वतः प्रशिक्षण पूर्ण करून ग्रामपंचायतीतील पाच कर्मचाऱ्यांनाही प्रशिक्षण दिले. प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करून या यंत्रणेची कार्यक्षमता दाखवून देण्यात आली.

नागाव ग्रामपंचायतीलाही हे अत्याधुनिक क्राफ्ट उपलब्ध करून देण्यात आले असून सरपंच मयेकर यांच्या नेतृत्वाखाली नागाव किनारा सुरक्षित, सज्ज आणि तंत्रज्ञानाने सक्षम बनत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

## सुक्या लाकडाची मागणी वाढली, महिला वर्गास मिळतोय रोजगार



**खोपोली : प्रतिनिधी**

महागाईने कहर केला असून, घरखर्चाचे नियोजन करताना गृहिणींना तारेवरची कसरत करावी लागत आहे.स्वयंपाकाचा गॅस मिळेनासा होत असतांना महागल्याने अनेक महिलांचा कल सध्या चुलीकडे वळले आहे.त्यामुळे चुलीसाठी लागणाऱ्या सरपणाची ग्रामीण भागात मागणीही वाढली आहे.चुलीवर शिजवलेल्या जेवणाची लज्जत औरच असते.या गृहिणींना सरपण पुरवण्यासाठी लाकडाची मोळी विकणाऱ्या आदिवासी महिला तालुक्याच्या परिसरात दिसत असून त्यांच्या रोजगाराचे साधन बनले आहे.

जंगलात असलेली लाकडे हेच त्यांचे उपजिवीकेचे साधन झाले आहे .गॅसचा तुटवडा आणि महागाईमुळे गॅस परवडत नसल्याने स्वयंपाक करण्यासाठी सुक्या लाकडाचा वापर करीत आसल्याने, आदिवासी समाज यांना रोजगार मिळत आहे.या सुकलेल्या लाकडांची मोळी २०० ते २५० रूपयांपर्यंत विकत असून आपला उदरनिर्वाह करीत आहेत. लाकडे विकून आदिवासी महिलांना वर्षातील ८ महिने रोजगार मिळत असल्याचे चित्र आहे.

## ‘आदिवासींना मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे’

**कर्जत : प्रतिनिधी**

'रायगड आर्थिकदृष्ट्या पुढे असला, तरी आदिवासी समाज मागे राहू नये, यासाठी हा उपक्रम आहे. आदिवासी भागात काही ठिकाणी अल्पवयीन विवाह, व्यसनाधीनता आणि शैक्षणिक मागासलेपण आहे. त्यांना मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे. या भरोसा सेल मार्फत आदिवासी भागातून पुढे आलेल्या यशस्वी तरुणांच्या यशोगाथा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी काम केले पाहिजे. आगामी काळात रायगड जिल्ह्यातील तेरा शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येणार असून, पोलीस दल आदिवासी वाड्यांमध्ये जाऊन महिलांचे समुपदेशन आणि मद्यपानमुक्ती वरही भर द्यावा लागेल.' असे महत्वापूर्ण प्रतिपादन रायगडच्या पोलीस अधिक्षक आँचल दलाल यांनी केले.

आदिवासी समाजालाही रायगड जिल्ह्याच्या प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी रायगड जिल्हा पोलीस दलाने सामाजिक पुढाकार घेतला असून कर्जत तालुक्यातील माणगाववाडी त‘भरोसा–प्रेरणा’ उपक्रम राबविण्यात आला.



## महाड येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर



**महाड : प्रतिनिधी**

महाड महसूल विभागाच्या वतीने महाड येथील करंजाडी या महसूल मंडल विभागामध्ये महाराष्ट्र शासनाचे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर संपन्न झाले. यावेळी विविध दाखल्यांचे सातबारा यांचे व नागरिकांच्या विविध योजनांचे अर्ज स्वीकारण्यात आले महाडचे सभापती प्रेरणा सावंत व तहसीलदार महेश शितोळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हे अभियान संपन्न झाले.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर शुक्रवार दिनांक १० एप्रिल रोजी महाड महसूल वतीने करंजाडी विन्हेरे या मंडल विभागात घेण्यात आले. यावेळी नागरिकांना उत्पन्नाचे दाखले, अधिवास दाखले, तसेच विविध शालेय संबंधित दाखले, जन्म मृत्यूचे दाखले, रहिवासी दाखले, आधार कार्ड शिधापत्रिका तसेच विद्यार्थ्यांचे विविध दाखले प्रत्यक्ष शाळांमधून जाऊन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले.

तसेच शेतकऱ्यांना सातबारे उतारे, पंतप्रधान शेतकरी सन्मान योजना व इतर सर्व योजनांचे अर्ज या अभियानात दाखल करून घेण्यात आले. तसेच यावेळी कृषी विभागाच्या वतीने गरजू शेतकऱ्यांना दोन ट्रॅक्टर व शेती अवजारांची वाटप करण्यात आले.


याप्रसंगी महाड पंचायत समितीच्या सभापती प्रेरणा सावंत, जिल्हा परिषद सदस्य निलेश ताठरे, उपसभापती सुरेश महाडिक, तहसीलदार महेश शितोळे उपस्थित होते. सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी तालुका भूमिलेख विभागाचे माने, मंडल अधिकारी वंदना गिमेकर व महसूल विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

## चित्रकार सुनील परदेशी यांना महाराष्ट्र कला सन्मान २०२६ पुरस्कार

**कर्जत : प्रतिनिधी**

पुण्यातील प्रतिष्ठित ‘आर्ट बिट्स महाराष्ट्र कला सन्मान २०२६’ पुरस्कारासाठी कलाकाराची निवड करण्यात आली असून हा बहुमान रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील प्रसिद्ध चित्रकार सुनील परदेशी यांना प्राप्त झाला आहे. लवकरच पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे.

आर्ट बीट फाऊंडेशन या संस्थेकडून दरवर्षी प्रदान केला



जाणारा हा पुरस्कार महाराष्ट्रातील कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कलाकारांना दिला जातो. दरवर्षीप्रमाणे जून – जुलै महिन्यात या पुरस्काराची घोषणा केली जाते आणि यंदा हा मान सुनील परदेशी यांना जाहीर झाला आहे. संस्थेने अधिकृत पत्राद्वारे आनंद व्यक्त करत त्यांच्या कलाक्षेत्रातील योगदानाची दखल घेतली असून त्यांनी हा पुरस्कार स्वीकृतीसाठी विनंती देखील केली आहे.

या सन्मानामुळे सुनील परदेशी यांच्या कला प्रवासाला अधिक बळ मिळणार असून रायगड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्राचा गौरव वाढला आहे.


महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना

ई निविदा सूचना क्र. ८८/२०२५-२०२६ (मुंबई) करीता

दिनांक २७/०३/२०२६ रोजी दैनिक नवराष्ट्र, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक पुढारी, ठाणे, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती.... अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या शुद्ध जल गुरूत्व वाहिनी सेवा रस्त्यावरील खड्डे बीएम व २० मि.मी. जाडीच्या सील कोटने भरणे. | ₹ ३९,७२,०८९.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक २२/०४/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ०३/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | महाड औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती... महाड औद्योगिक क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वीची व पावसाळ्यानंतरची कामे... महाड औद्योगिक क्षेत्रात रस्त्यालगतच्या गटाराची साफसफाई, सीडीची कामे, पावसाचे पाणी वाहन्यासाठी कट तयार करणे व रस्त्याच्या कडेला असलेला कचरा काढणे. | ₹ २३,०३,४५७.०० |
| २ | रोहा औद्योगिक क्षेत्र.... रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजना व सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती..... रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजना व सांडपाणी निःसारण योजनेच्या उदंचनगृहातील एलटी पॅनेलच्या दैनंदिन देखभालीसाठी स्पेअर्स व इतर साहित्यासह वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ३२,९५,४५०.०० |
| ३ | रानसई पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती ..... उरण कार्यालयाच्या आवारात, खराब झालेल्या व कोसळलेल्या यूसीआर कंपाऊंड भिंतीचे, आवश्यक ठिकाणी झिंक लेपित कॉन्सर्टिना कॉइल कुंपणासह कंपाऊंड भिंत बांधून बळकटीकरण व पुनर्बांधणी करणे. | ₹ १८,०८,५७४.०० |
| ४ | विळे भागड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती.. भागड पाणीपुरवठा योजनेचे व अतिरिक्त महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेचे परिचालन, देखभाल व दुरूस्ती एक वर्षाच्या कालावधीकरीता करणे. | ₹ २१,०६,६७२.०० |
| ५ | विळे भागड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती...... विळे भागड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेच्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक फ्लोमीटर सिस्टीमची दोन वर्षांच्या कालावधीकरीता वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ११,१९,०२०.०० |
| ६ | महाड, पोलादपूर व रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची व सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती..... महाड, पोलादपूर व रोहा येथे बसविण्यात आलेल्या ट्रान्सफॉर्मरची किरकोळ दुरूस्तीसह तेलाची गाळणी करणे. | ₹ ११,०७,१२०.०० |
| ७ | महाड व विळे- भागड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजना व सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती..... महाड व विळे- भागड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेच्या विविध ठिकाणच्या एचटी व एलटी पॅनेलची दैनंदिन देखभालीसाठी स्पेअर्स व इतर साहित्यासह वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ १२,११,४६०.०० |
| ८ | रानसई पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.........रानसई येथील जलशुद्धिकरण केंद्र व धरण परिसरातील विद्यमान यूसीआरच्या दगडी कंपाऊंड भिंतीची उंची वाढवणे. | ₹ २८,७२,८६५.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक १५/०४/२०२६ ते दिनांक २९/०४/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २०/०४/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २२/०४/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# उरणमधून २.५ लाखांचे हेरॉईन जप्त



**उरण : बातमीदार**

उरण पोलिसांनी अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या व त्याचे सेवन करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेदरम्यान पोलिसांनी शुक्रवारी दुपारी जासई येथील पार्किंगमध्ये छापा मारून अमली पदार्थाची विक्री करणाऱ्या तरुणासह त्याचे सेवन करणाऱ्या दोघांना असे एकूण तीन जणांना अटक करीत दोन लाख ५२ हजार ८०० रुपये किमतीचे हेरॉईन जप्त केले आहे. तिघांना न्यायालयात हजर केले असता त्यांना ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

उरण तालुक्यातील जासई येथील शीतल परिवहन पार्किंगच्या मागे असलेल्या जांभळाच्या झाडाखाली काही तरुण संशयास्पद अमली पदार्थांचे सेवन करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्याआधारे उरण पोलिसांनी १० एप्रिल रोजी दुपारी २ च्या सुमारास छापा मारला. यावेळी तेथे रवींद्र कल्याण शेट्टी (२७), गणेश दत्तू भिडे (२५) व गणेश विनय पाटील (१९) हे तिघेही अमली पदार्थाचे सेवन करताना आढळले.

पोलिसांनी त्यांची झडती घेतली असता, गणेश पाटील याच्याकडे ६.३२ ग्रॅम वजनाची हेरॉईनच्या ८५ पुड्या सापडल्या. आंतरराष्ट्रीय बाजारात अमली पदार्थाची किंमत अंदाजे २,५२,८०० रुपये आहे. या कारवाईत तिघांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांनाअटक केल्याची माहिती वपोनि हनिफ मुलाणी यांनी दिली. तिघांना न्यायालयात हजर केले असता, तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलानी यांनी सांगितले.

उरण मध्ये मोठया प्रमाणात नशेच्या औषधांची विक्री खरेदी मोठया प्रमाणात होत असून अशा खरेदी विक्री करणाऱ्या व्यक्ती वर त्वरित कठोर कारवाई करण्याची मागणी प्रशासनाकडे उरण मधील विविध सामाजिक संस्था संघटनांनी केली आहे.

# वाढत्या तापमानामुळे आरोग्याची काळजी घ्या : नवी मुंबई महापालिकेचे आवाहन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने केले आहे. उन्हाळ्यात होणाऱ्या त्रासांपासून बचाव करण्यासाठी सोपे नियम पाळण्याचे मार्गदर्शन करण्यात आले आहे. महापालिकेच्या सूचनेनुसार, नागरिकांनी दिवसभरात पुरेसे पाणी पिण्यावर भर द्यावा.

ताक, लिंबूपाणी, नारळपाणी यांसारख्या द्रव पदार्थांचा आहारात समावेश करावा. तसेच, पांढऱ्या किंवा फिकट रंगाचे सैलसर कपडे वापरणे आणि डोक्यावर टोपी घालणे



आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. उन्हाचा तीव्र परिणाम टाळण्यासाठी बाहेरील कामे सकाळी १० वाजण्यापूर्वी किंवा सायंकाळी ४ नंतरच करावीत. दुपारी १२ ते ४ या वेळेत घराबाहेर पडणे टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

याचबरोबर, उन्हात शारीरिक कष्टाची कामे टाळावीत, तसेच दुपारी २ ते ४ या वेळेत स्वयंपाक करणे शक्यतो टाळावे, असेही सांगण्यात आले आहे. आरोग्यास अपायकारक ठरू शकणारे चहा, कॉफी, मद्यपान आणि कार्बोनेटेड पेये यांचा वापर कमी ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे. लहान मुले, गरोदर महिला आणि वृद्ध व्यक्ती यांची विशेष काळजी घेण्याची गरजही अधोरेखित करण्यात आली आहे.

उन्हाळ्यातील आरोग्यविषयक अधिक माहितीसाठी नागरिकांनी जवळच्या महापालिका रुग्णालय किंवा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

# माय भारत बजेट क्वेस्ट २०२६मध्ये गुंजला नारी शक्तीचा आवाज




**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

राजकारण असो अथवा समाजकारण या क्षेत्राकडे अगदी शालेय जीवनापासून वळणे गरजेचे असून माय भारत युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालयाच्या माध्यमातून विकसित भारत घडविण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून माय भारत बजेट क्वेस्ट या सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून तरुणांसाठी चांगल्या संधी चालून येत असल्याचे प्रतिपादन नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी नेरुळ येथे केले.

युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकारच्या वतीने डॉ. डी वाय पाटील विद्यापीठ नेरूळ, नवी मुंबई येथे "नारी शक्ती विकसित भारत की आवाज – समावेशक लोकशाही बळकटीकरण" या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. व्यासपीठावर डी. वाय. पाटील समुहाचे मॅनेजिंग ट्रस्टी डॉ. राजलक्ष्मी पाटील, राज्य संचालक अमित फुंडे, उपसंचालक स्नेहल बासुटकर आदी मान्यवर उपस्थित होते. याच उपक्रमाचा भाग असलेला दुसरा कार्यक्रम खारघर येथे संपन्न झाला.संडे ऑन सायकल अशा या उपक्रमात बी. डी. सोमाणी इंटरनॅशनल स्कूल ते रांजणपाडा पार्किंग व प्रशांत कॉर्नर मार्गे पुन्हा सोमाणी स्कुल असे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

सोमवारी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे या युवांना आभासी मार्गदर्शन लाभणार आहे.

# मदत करण्याच्या बहाण्याने लुटले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मदत करण्याचा बहाण्याने दोन इसमांनी ३२ वर्षीय तरुणावर चाकूने वार करून त्याला लुटल्याची घटना टेंभोडे गावाच्या परिसरात घडली. या प्रकरणी दोघांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात आठ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

गौतम हाके हा दौंड, कासुर्डी, पुणे येथे राहत असून ८ एप्रिल रोजी गेट नंबर पाच, कळंबोलीच्या बाजूला असलेल्या रेल्वे पटरी जवळ बसला होता. त्याच्याजवळ दोन अनोळखी इसम आले आणि हे दोन्ही ईसम रेल्वे पटरी क्रॉस करून पलीकडे गेले. त्यानंतर एक इसम पुन्हा थोड्यावेळाने येऊन मदत करा असे बोलला. यावेळी माझा भाऊ चक्कर येऊन पडला आहे आणि गौतम याला झाडाजवळ घेऊन गेला. यावेळी झाडाजवळ असलेल्या इसमाने त्याला पाठीमागून धरले आणि खिशातील २ हजार ४०० रुपये काढून घेतले. त्याला विरोध केला असता चाकूने दंडावर वार केले आणि छातीवर वार केले. पोलिसांना फोन केला असता एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# सानपाड्याच्या विविध समस्यांवर जनता दरबारात चर्चा

## निलेश कचरे यांनी मांडल्या समस्या ▌ मंत्री गणेश नाईकांकडून उपाययोजनांचे निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

वनमंत्री गणेश नाईक हानी वाशी येथील भावे नाट्यगृहात आयोजित केलेल्या जनता दरबारात सानपाडा विभागातील समस्यांबाबत सामाजिक कार्यकर्ते निलेश कचरे यांनी विविध समस्या मांडल्या. या सर्व बाबी ऐकून घेत वनमंत्री गणेश नाईक यांनी त्या समस्या सोडविण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

सानपाडा गावठाण भागातील स्वच्छता व कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न गंभीर बनला आहे. अरुंद रस्त्यांमुळे मोठ्या कचरा वाहनांना प्रवेश मिळत नसल्याने नियमित कचरा संकलनात अडथळे येत आहेत. यावर उपाय म्हणून लहान तीन चाकी कचरा संकलन वाहनांची संख्या वाढविण्याची मागणी करण्यात आली.

तसेच वाहतूक कोंडी व बेशिस्त पार्किंगमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. यासाठी ट्रॅफिक ऑडिट, नो–पार्किंग झोनची कडक अंमलबजावणी, ऑड–इव्हन पार्किंग प्रणाली आणि रस्त्यांचे नियोजनबद्ध व्यवस्थापन यांसारख्या उपाययोजना सुचविण्यात आल्या.



आपत्कालीन सेवांना होणारा विलंब हा देखील गंभीर मुद्दा अधोरेखित करण्यात आला. रुग्णवाहिका व अग्निशमन दलाला वेळेत पोहोचता न आल्याने जीवितास धोका निर्माण होत असल्याने 'इमर्जन्सी कॉरिडॉर' व 'प्रायोरिटी रूट्स' कायमस्वरूपी मोकळे ठेवण्याची मागणी करण्यात आली.

दरम्यान, सानपाडा पोलीस स्टेशन पाम बीच येथे स्थलांतरित झाल्यानंतर कायदा व सुव्यवस्थेवर परिणाम झाल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. पोलिसांची उपस्थिती कमी झाल्यामुळे गुन्हेगारीत वाढ झाल्याचा मुद्दा मांडत सेक्टर ८ येथील जुन्या ठिकाणी पोलीस चौकी सुरू ठेवणे व नियमित पेट्रोलिंग वाढविण्याची मागणी करण्यात आली.सादर करण्यात आलेल्या सर्व मुद्द्यांची गांभीर्याने दखल घेत आमदार गणेश नाईक यांनी नवी मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनील पवार तसेच संबंधित पोलीस प्रशासनाकडे विषय वर्ग करून तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

# गव्हाण येथील विद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रांतीसूर्य राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले.

शासनाच्या पटपडताळणी या विशेष मोहिमेचे प्रमुख चिंचपाड्याचे केंद्रप्रमुख धनंजय ठाकूर यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पट पडताळणी पथकाचे तंत्रस्नेही शिक्षक राजेश गंजीकर व नितीन ठाकूर, राजेंद्र चौधरी, करूणा तांडेल, माणिक घरत, अर्चना पाटील, सागर रंधवे, एच.आर. पाटील, शितलकुमार म्हात्रे, प्रमोद करावकर, सुरेश पारखे, सारिका ठाकूर, उज्वला म्हात्रे, वृषाली म्हात्रे, संपदा म्हात्रे, प्रतिज्ञा घरत आदी उपस्थित होते.



शासनाच्या नियमाप्रमाणे विद्यालयात विशेष पडताळणी मोहीम पार पडली. यावेळी धनंजय ठाकूर, तंत्रस्नेही शिक्षक राजेश गंजीकर व नितीन ठाकूर यांनी विद्यालयातील सर्व वर्गांना भेट दिली व पट पडताळणी केली.

यावेळी विद्यालयाचे उपशिक्षक व संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, ग्रंथपाल महेश म्हात्रे, विशांत ठाकूर, शितलकुमार म्हात्रे, संपदा म्हात्रे, सागर रंधवे व सर्व वर्ग शिक्षक उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात महात्मा फुलेंची जयंती उत्साहात साजरी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ग्रंथालय समितीतर्फे शनिवारी क्रांतिसूर्य थोर समाज सुधारक महात्मा ज्योतीराव फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.



महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली तसेच त्यांच्या कार्याचा गौरव करत शिक्षण, स्त्री–पुरुष समानता आणि सामाजिक न्याय यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची आठवण करून दिली. महाविद्यालयातील ग्रंथालयाचे ग्रंथपाल समाधान बेहेरे यांनी त्यांच्या मनोगतातून महात्मा फुले यांच्या विचारांचे आजच्या काळातील महत्त्व अधोरेखित केले तसेच युवकांनी त्यांच्या आदर्शांवर चालत समाजात सकारात्मक बदल घडवून आणावा, असे आवाहन करण्यात आले.

माजी विद्यार्थी, महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी ममहात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली अर्पण केली. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. पूजा लांजेकर यांनी केले तसेच ग्रंथालय समिती इतर सर्व सदस्य शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व माजी विद्यार्थी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# झोपडपट्टी पुनर्वसन कार्यशाळा यशस्वी



**नवी मुंबई : बातमीदार**

अनुषंगाने डॉ.पंकज भोयर साहेब (राज्यमंत्री गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार, खनिकर्म) यांच्या दालनात दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी झोपडीपट्टी पुनर्वसन संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली होती. त्याची पूर्तता करण्याकरिता बेलापूर विधानसभा मतदारसंघातील झोपडपट्टी पुनर्वसन संदर्भातील विविध प्रश्नांवर मार्गदर्शन करण्यासाठी बेलापूर येथील सुनील गावस्कर मैदानावर आयोजित करण्यात आलेली कार्यशाळा यशस्वीरित्या झाली.

कार्यशाळेत झोपडपट्टी पुनर्वसन योजनांची सविस्तर माहिती मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे उपमुख्य अभियंता राजकुमार पवार व सक्षम प्राधिकारी–४ मिनल पालांडे यांनी नागरिकांना दिल्या. तसेच पुनर्वसन प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी, आवश्यक कागदपत्रे, पात्रता निकष आणि शासनाच्या धोरणांविषयी तज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यशाळेला स्थानिक नागरिक, झोपडपट्टीधारक, सामाजिक कार्यकर्ते आणि संबंधित अधिकारी यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

येणाऱ्या काही काळातच १५१ बेलापूर मतदारसंघातील बेलापूर विभागामधील रमाबाई आंबेडकर नगर, से–९ (गावस्कर मैदान) सीबीडी, रमाबाई आंबेडकर नगर, से–८, सीबीडी, संभाजी नगर, सीबीडी, जय दुर्गा माता नगर, सीबीडी, टाटा नगर व इतर झोपडपट्टी धारकांना आपल्या हक्काचा घर मिळणार असल्याने झोपडीधारकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून आमदार मंदा म्हात्रे यांचे झोपडीधारक यांनी मनपूर्वक आभार व्यक्त केला.

यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत नगरसेविका भारती कोळी, नगरसेविका पूनम पाटील, नगरसेविका सरोज पाटील, नगरसेवक अमित पाटील, माजी विरोधपक्ष नेता पंढरीनाथदादा पाटील, माजी नगरसेवक अशोक गुरुखे, माजी नगरसेवक दि.ना.पाटील, भाजपा नेते तथा माजी नगरसेवक निलेश म्हात्रे, समाजसेवक रोहिदास पाटील, समाजसेवक अशोक नरबागे, अध्यक्ष पंजाब वेलफेयर असोसिएशन कमळ शर्मा, अध्यक्ष हरियाणा वेलफेयर असोसिएशन बलबीरसिंह चौधरी, ॲडव्हाकेट संतोष पळसकर, सिनु डॅनियल, वास्तुविशारद अमित गाडे साहेब तसेच अन्य अधिकारी, सीबीडी मंडळ अध्यक्ष अजय सिंग व झोपडीधारक उपस्थित होते.

# लोकसहभागातून डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकसहभागातून महानगरपालिकेतर्फे दिनांक १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त पनवेल शहरामध्ये भव्य मिरवणूक व आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांनी नागरिकांनी मोठ्या संख्येने या मिरवणुकीत सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.

१४ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता



नागरिकांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ एकत्र जमून, पुष्पहार अर्पण केला जाईल. यावेळी पाठपूजा करुन मानवंदना दिली जाईल. यानंतर सकाळी ७.२० वाजता पुतळ्याजवळून भव्य मिरवणुकीला प्रारंभ होईल. मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौक, एम.टी.एन.एल. रोड, संत जगनाडे महाराज चौक, रोहिदास वाडा, टपाल नाका, कर्नाळा सर्कल, भाजी मार्केट, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, विरुपाक्ष मंदिर, निल सॉलिटीयर इमारत, छ. शिवाजी चौक या मार्गे नाट्यगृह येथे पोहोचून समाप्त होईल. त्यानंतर नाट्यगृह येथे पुढील कार्यक्रम होईल.

# झाडे लावण्याची सुरुवात स्वतःपासूनच करा -अभिनेते सयाजी शिंदे

**नवी मुंबई : बातमीदार**

जगात पहिल्यांदा झाड आले, मग माणसे आली. माणसांनंतरही झाडेच राहणार आहेत. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या वयाइतकी झाडे लावावीत आणि दुसऱ्याला सांगण्यापेक्षा स्वतःपासूनच सुरुवात करावी अशा शब्दात सुप्रसिद्ध अभिनेते व पर्यावरण स्नेही सयाजी शिंदे यांनी उपस्थितांशी सुसंवाद साधला.



नवी मुंबई महापालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञानस्मारक, ऐरोली येथे बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त सुरू असलेल्या 'जागर २०२६' या व्याख्यानमालेतील सहावे व्याख्यानपुष्प गुंफताना श्री. सयाजी शिंदे यांनी 'सह्याद्री देवराई' या उपक्रमाच्या प्रवासाचा व आपल्या अभिनय कारकीर्दीचा आलेख प्रेक्षकांशी संवाद साधत मांडला.

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १६५ व्या जयंतीनिमित्त जाहीर केलेल्या 'सामाजिक समता सप्ताह' कालावधीत ही 'जागर' व्याख्यानमाला होत आहे.

या व्याख्यानाप्रसंगी महापौर श्रीम सुजाता पाटील व महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सयाजी शिंदे यांचे स्वागत केले.

त्यांनी नवी मुंबई महानगरपालिकेने उभारलेले भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक हे अत्यंत वेगळ्या प्रकारचे स्मारक असून प्रत्येकाने या ठिकाणी आवर्जून भेट द्यायला हवी, असे आवाहन केले.

# भूसंपादनाअभावी दासगाव-गोठे खाडीपूल रखडला

**महाड : प्रतिनिधी**

दासगाव-गोठे येथील सावित्री नदीवरील प्रस्तावित खाडी पुलाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प भूसंपादनाच्या प्रश्नामुळे सध्या रखडला असून शेतकरी व प्रशासन यांच्यातील आर्थिक मोबदल्याच्या वादामुळे पेच निर्माण झाला आहे.



राज्याचे कॅबिनेट मंत्री तथा स्थानिक आमदार भरत गोगावले यांच्या प्रयत्नातून या पुलाला प्रशासकीय मान्यता मिळाली असली तरी प्रत्यक्ष काम सुरू होण्यास विलंब होत आहे. या प्रकल्पासाठी १०२ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सुमारे साडेपाच कोटी रुपयांचा भूसंपादन खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे एकूण खर्च १०७ ते १०८ कोटी रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. सुरुवातीला पुलाच्या कामासाठी काढण्यात आलेल्या निविदेत अंदाजे ६१ कोटी रुपयांचा प्रस्ताव (जीएसटी वगळता) मंजूर करण्यात येऊन वर्क ऑर्डर देखील झाली होती. सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांनी पुलाचा आराखडा तयार करून अहवाल सादर केला आहे, मात्र सध्या या पुलाच्या कामास शुभारंभ होण्याची कोणतीही चिन्हे दिसून येत नाहीत.

दरम्यान, या पुलासाठी आवश्यक जमिनींचे संपादन खाजगी वाटाघाटीद्वारे करण्याचा प्रस्ताव असून यासंदर्भात उपविभागीय अधिकारी, महाड यांच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांनी शासनाने जाहीर केलेला मोबदला मान्य नसल्याची भूमिका घेतली आहे. शेतकरी अल्पभुधारक असून शेती हा प्रमुख उदरनिर्वाहाचा स्रोत असल्याने समृद्धी महामार्ग तसेच दिघी राष्ट्रीय महामार्गाच्या धर्तीवर मोबदला मिळावा, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे. याशिवाय मिळणाऱ्या मोबदल्यावर १०० टक्के वाढ देण्यात यावी, अशीही अट त्यांनी घातली आहे. शेतकऱ्यांनी फेब्रुवारी च्या शेवटच्या हप्त्यात प्रांताधिकारी महाड यांच्याकडे दिलेल्या निवेदनात इतरही महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत.

संपादित जमिनीव्यतिरिक्त उर्वरित जमिनींची स्पष्ट हद्द निश्चित करून त्या शेतकऱ्यांच्या ताब्यात देण्यात याव्यात, तसेच पोटहिस्से व गट नकाशे संबंधित खात्याने तयार करून शेतकऱ्यांच्या नावे करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

पूरस्थितीचा धोका लक्षात घेऊन पुलाच्या आराखड्यात बदल करण्याची मागणीही शेतकऱ्यांनी केली आहे. २००५ व २०२१ मधील अतिवृष्टीमुळे आलेल्या महापुराचा अनुभव लक्षात घेता प्रस्तावित पुलासाठी मातीचा भराव टाळून पिलर कॉलमवर गर्डर पद्धतीने उन्नत पूल उभारावा, अन्यथा पूरस्थिती अधिक गंभीर होऊ शकते, असा इशारा देण्यात आला आहे.

तसेच सध्याचा राष्ट्रीय महामार्गालगतचा जोडरस्ता अरुंद व धोकादायक असल्याने प्रस्तावित पूल गावाबाहेरून सरळ महामार्गाला जोडावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा अपघात होऊन जिवितहानी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

हा पूल खाडेपट्ट्यातील ग्रामस्थांसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून सध्या आठ किलोमीटरचा वळसा घालून करावा लागणारा प्रवास या पुलामुळे टाळता येणार आहे.

## आडनाळे गावात मोबाईलचा स्फोट; तरुण गंभीर जखमी

**माणगाव : बातमीदार**



रायगड जिल्ह्यात उष्णतेचा पारा हा दोन दिवसात ४० ते ४२ अंश सेल्सिअल डिग्री वाढला असून याचा परिणाम आता आपण नेहमी वापरत असलेल्या मोबाईल वर होत आहे. नागरिक तसेच तरुणाई मोबाईल आपल्या पुढच्या पॅन्टच्या खिशात तसेच वरील शर्टाच्या खिशात ठेवत असून हा मोबाईल उष्णतेमुळे आता आपला जीवघेणा झाला आहे. रायगड जिल्ह्यातील तळा तालुक्यातील आडनाळे या गावातील तरुण महेश मोतीराम नाक्ते वय ३८ सध्या राहणार मुंबई हे आपल्या गावी एका कार्यक्रमानिमित्त रविवार दिनांक १२ एप्रिल रोजी सकाळी आले होते. ते घरात बसले असता दुपारी बारा ते साडेबाराच्या दरम्यान अचानक जीन्स पॅन्ट मध्ये खिशात ठेवलेल्या एका कंपनीच्या मोबाईलचा स्फोट झाला. महेश नाक्ते यांनी घातलेली जीन्स पॅन्टचा पुढील खिसा पूर्णपणे जळून खाक झाला. या स्फोटामध्ये त्यांच्या डाव्या मांडीला तसेच उजव्या हाताचा बोट तसेच डाव्या हाताची बोटे जळाली आहेत. महेश नाक्ते हे या स्फोटात जखमी झाले

## माणगाव पोलीस ठाण्याची १०८ वर्षांची दगडी इमारत; ऐतिहासिक वारसा जपण्याची मागणी

**माणगाव : प्रतिनीधी**

माणगाव शहराच्या मध्यभागी उभी असलेली तहसीलदार कार्यालय आणि माणगाव पोलीस ठाण्याची ही ऐतिहासिक इमारत म्हणजे केवळ दगडांची रचना नसून, ती इतिहासाच्या असंख्य आठवणींची जिवंत साक्ष आहे. सन १९१८ मध्ये इंग्रज सत्ताकाळात ब्रिटिश सरकारने उभारलेली ही भव्य इमारत आज तब्बल १०८ वर्षांचा प्रवास पूर्ण करूनही तितक्याच दिमाखात उभी आहे.



स्वातंत्र्यपूर्व काळात 'न्यू मामलेदार कचेरी' या नावाने ओळखली जाणारी ही वास्तू, त्या काळच्या प्रशासकीय व्यवस्थेचे केंद्र होती. विशेष म्हणजे, त्या काळी तहसीलदार कार्यालय आणि पोलीस ठाणे एकाच इमारतीत कार्यरत होते. काळाच्या ओघात जागेची कमतरता भासू लागल्याने तहसीलदार कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत उभारण्यात आली, मात्र जुनी इमारत आजही तितक्याच मजबुतीने उभी आहे. दगडी बांधकामात उभारलेली ही इमारत तिच्या भक्कमपणासाठी आणि अभेद्य रचनेसाठी ओळखली जाते. मोठ्या सळईंचा दरवाजा, मजबूत प्रवेशद्वारे आणि आत असलेले सागवान लाकडाचे खांब-वासे आजही त्या काळच्या कारागिरीची साक्ष देतात. विशेष बाब म्हणजे, या पोलीस ठाण्यातील अभेद्य कोठडीतून आजपर्यंत एकही कैदी पळून जाऊ शकलेला नाही,

या वास्तूच्या भिंतींनी अनेक ऐतिहासिक क्षण अनुभवले आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात समाजसुधारक, स्वातंत्र्यसैनिक आणि राजकीय नेत्यांना याच ठिकाणी अटक करून कोठडीत ठेवण्यात आले होते. त्यामुळे ही इमारत केवळ प्रशासकीय केंद्र नसून, ती स्वातंत्र्यलढ्याच्या आठवणींनी भारलेली एक पवित्र भूमी आहे.

या इमारतीला तीन भव्य प्रवेशद्वारे असून, पूर्वी येथे अनेक सरकारी कार्यालये कार्यरत होती. त्याचबरोबर ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या निवासासाठी परिसरात उभारलेल्या दगडी चाळी आजही टिकून आहेत, ज्यामुळे या ठिकाणाला एक वेगळे ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र, काळाच्या ओघात या ऐतिहासिक वारशाचे जतन आणि संवर्धन करणे अत्यंत गरजेचे बनले आहे.

## आज माणगावात कोट्यवधींच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन

### खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे यांची उपस्थिती

**माणगाव : प्रतिनिधी**

आपल्या शहराचा चेहरा-मोहरा बदलण्याचा आणि नागरिकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि भावनिक क्षण माणगावकरांच्या वाट्याला आला आहे. माणगाव नगरपंचायतीच्या वतीने विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात आणि जनसहभागातून पार पडणार आहे.

शहरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्ते, गटार, स्वच्छता, सभागृह बांधकाम, स्मशानभूमी विकास अशा मूलभूत आणि अत्यावश्यक कामांना अखेर सुरुवात होत असल्याने नागरिकांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ही कामे केवळ विकासाची चिन्हे नसून, ती प्रत्येक माणगावकराच्या दैनंदिन आयुष्यातील अडचणी दूर करणारी, त्यांना सुसह्य जीवन देणारी आशेची किरणे आहेत.

या सर्व विकासकामांसाठी अंदाजे २ कोटी ७८ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असून, त्यातून शहराच्या पायाभूत सुविधांना नवी दिशा मिळणार आहे. विशेष म्हणजे, माणगावच्या सर्वांगीण प्रगतीचा विचार करून मंत्री कु. आदिती तटकरे यांनी अतिरिक्त २ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असल्याने भविष्यातील विकासकामांसाठीही नवी दारे खुली झाली आहेत. ही बाब माणगावकरांसाठी दिलासा देणारी आणि आश्वासक ठरली आहे.

या भव्य सोहळ्याचे उद्घाटन खासदार सुनील तटकरे यांच्या शुभहस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी मंत्री कु. आदिती तटकरे राहणार आहेत. तसेच माजी आमदार अनिकेत तटकरे आणि ॲड. राजीव सावळे यांचे प्रमुख उपस्थिती होणार आहे.

सोमवार, दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी उतेखोल, होळीचा माळ आणि नाणोरे माणगाव येथे जाहीर सभा होणार आहेत. या सोहळ्याला नगराध्यक्ष श्रीमती शर्मिला शोभन सुर्वे यांनी नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

आजपर्यंत विविध अडचणींना सामोरे गेलेल्या माणगावकरांसाठी हा सोहळा केवळ कार्यक्रम नाही, तर तो त्यांच्या अपेक्षा, स्वप्ने आणि विश्वास यांना नवी उमेद देणारा क्षण आहे.

# तळा तालुक्यात रब्बी हंगामातील भातशेती झाली दुर्मिळ

## अनेक वर्षांपासून वावे हवेली धरणाचा कालवा दुरूस्तीच्या प्रतिक्षेत





**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील एकमेव अमेरिकन अर्थसाहय्याने बांधलेले व सिंचन क्षेत्रावर शेती होणारे वावेहवेली धरण आहे .परतुं गेल्या अनेक वर्षापासून धरणाचे कालवे नादुरुस्त आहेत. या धरणाचे १९८७ व १९८८ ला काम सुरू झाल्यानंतर १९९० ला या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले.त्याचवर्षी प्रत्यक्ष सिंचनास सुरूवात झाली.धरणात ३.१७ दशलक्ष घनमीटर पाणी क्षमता आहे.त्यामधील ३.१३ दशलक्ष घनमीटर पाणी उपयुक्त आहे.०.४ निरूपयोगी पाणी आहे.परंतु गेल्या अनेक वर्षापासून हे पाणी शेतीला मिळत नाही,अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.एप्रिल मे महिन्यात रब्बी पिकांचा हंगाम सुरू आहे.या कालावधीत भात शेतीची कापणी मोठ्या प्रमाणात होत होती.या भात शेतीला कालव्यातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याची कालव्यांच्या दुरूस्ती अभावी शेतीला पाणी नसल्याने कालवा दुरूस्त करावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होताना पहावयास मिळत आहे.

वावेहवेली धरणाअंतर्गत सिंचना साठी वावेहवेली,बामणघर,अंबेली, राणेचीवाडी,खैराट या गावांतील शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणीपुरवठा होत होते.यामधे एकूण २२१ हेक्टर सिंचन क्षेत्र आहे.यापैकी डाव्या कालव्यातून १०१ हेक्टर सिंचन क्षेत्र तर उजव्या कालव्यातून १२० हेक्टर सिंचन क्षेत्र पाईप लाईनने केला जात होता.एवढे क्षेत्र सिंचनाखाली येत होते.मात्र आजमितीस कालव्यांच्या नादुरूस्तीमुळे दोन्ही कालव्यातून पाणी नाही तरीही काही शेतकरी अंदाजे २० हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र ओलिताखाली घेत आहेत.यामुळे या दोन्ही कालव्यांची दुरुस्तीची कामे होणे गरजेचे आहे.

डावा कालवा हा दगडी बांधकाम सिमेंट मातीचा असून सध्या कालव्याचे बेडकॉंक्रिटीकरण निखळून गेले आहेत.त्यामुळे या कालव्यातून पाणी लिकेज आहेत यामुळे शेवटपर्यंत पाणी जात नाही.

उजवा कालवा बंदिस्त नलिका असूनही मुख्य पाईप लाईन शेतांमधून गेली आहे.ही पाईपलाईन अनेक ठिकाणी फुटल्याने पाणी सोडल्यानंतर फुटलेल्या पाईप मधून बाहेर जातो.त्यामुळे पाणी शेवटपर्यंत पोहचत नाही,याचा शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे.शेतकऱ्यांना हव्या त्या पध्दतीने शेती करता येत नाही.हा परिणाम होत आहे.पर्यायाने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे.तसेच आता या समस्यांमुळे शेतकरीवर्ग रब्बी पिकाकडे दुर्लक्ष करत आहे.आतातर शेतकरी वर्ग रब्बी हंगामात भातशेती करत नाही हे चित्र पहावयास मिळत आहे.कालव्यांची दुरूस्ती व्हावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.जर का कालव्याची दुरूस्ती झाली तर पुन्हा उन्हाळी भातशेती या भागात बहरेल.या वावेहवेली धरणाच्या ज्या भागात धरणाच्या पाण्याचा ओलावा आहे.त्या भागात आता तरुण वर्ग ही शेतीकडेवळून भाजीपाल्याचा पिक काढत आहेत.त्यामधे वांगा ,कारली, दुधी भोपळा,भेंडी,मिरची,टॅमेटो, कडधान्य इत्यादी पिके घेत आहेत.शेतकरी वर्गातून म्हटले जात आहे की धरणाचे कालवे त्वरीत दुरूस्त करावे.कालवे दुरूस्ती न झाल्याने आम्हा शेतकऱ्यांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.याकडे शासनाने लक्ष घालून दुरुस्ती करावी अशी मागणी करत आहेत.

## कोशिंबळे येथील हनुमान मंदिराचा जीर्णोध्दार व प्राणप्रतिष्ठा सोहळा भक्तिमय वातावरणात

### 'मंदिराकडे बघतच चिंतन मनन करावे अशा पद्धतीचे सुबक मंदिर'

**माणगाव : प्रतिनिधी**

मंदिराकडे बघतच चिंतन मनन करावे अशा पद्धतीचा सुबक मंदिर ग्रामस्थांनी आपला योगदान देत व दानशूर व्यक्तींच्या सहकार्यातून उभारला असल्याचे गौरवोद्गार रायगड - रत्नागिरी लोकसभा मतदार संघाचे खा.सुनीलच्या तटकरे यांनी कोशिंबळे तर्फे तळे येथील कार्यक्रमात बोलताना काढले.



कोशिंबळे तर्फे तळे येथील श्री हनुमान मंदिराचा जिर्णोध्दार व प्राणप्रतिष्ठा सोहळा याचे उदघाटन शनिवार दि.११ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५: ३० वा. रायगड - रत्नागिरी लोकसभा मतदार संघाचे खा.सुनील तटकरे यांच्याहस्ते भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाले. त्यावेळी उपस्थितांना खा.तटकरे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ नेते महादेवराव खेळू बक्कम उपस्थित होते. तसेच यावेळी जेष्ठ नेते शेखरशेठ देशमुख,जेष्ठ नेते हुसेन रहाटवीलकर,महादेव चंद्रकांत बक्कम,राजिप सदस्य अस्लम राऊत,जिल्हा राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे,तालुका राष्ट्रवादीचे अध्यक्ष काका नवगणे,प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक सचिव दिपक जाधव, माणगाव पंचायत समिती उपसभापती मनीषा मालोरे,पंचायत समिती सदस्या संगीत बक्कम,जिल्हा राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष उदय अधिकारी,माजी पंचायत समिती सदस्य शैलेश भोनकर,सरपंच ऋतिका गायकवाड,वारक सरपंच वैष्णव साठे,गोरेगाव सरपंच जुबेर अब्बासी,माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश मालोरे,दिनेश गुगले,सहदेव बक्कम,महेश महाजन,बाळकृष्ण बेंडखळे,विनोद बागडे,संजय बक्कम,सौरभ बक्कम,प्रकाश धुमाळ,राजेंद्र जाधव,धोंडू बक्कम,सखाराम जाधव,रमेश बक्कम आदींसह कोशिंबळे तर्फे तळे येथील ग्रामस्थ बंधू - भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना खा.सुनील तटकरे पुढे म्हणाले कि,गावाचा ऐक्य मजबूत असेल तर गावाचा विकास होऊन उद्याच्या पिढीसाठी ते एक आदर्श ठरू शकते. या गावात हनुमान मंदिराची साकारलेली इमारत सुबक असून मंदिरात प्रवेश केल्यावर मनाला प्रसन्नता वाटते. मुंबई - गोवा महामार्गावरील हे गाव असून या गावातील विविध विकासाची कामे आपण केली असून या गावातील प्रलंबित विकासकामे निश्चितच करू. ग्रामस्थांनी मागणी केलेला सुंदरसा बगीचा हा देखील निश्चितच करू. आपला हा सारा परिसर विकसित होत असून प्रदूषण विरहित कारखाने याठिकाणी येणार असून त्यातून या साऱ्या परिसरातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराच्या संधी त्यातून निर्माण होतील. .

## रायगड जिल्ह्यातील अतिरिक्त शिक्षकांचे झाले समायोजन

**माणगाव, अलिबाग :** शासनाच्या धोरणानुसार दरवर्षी विद्यार्थ्यांच्या पटसंख्येच्या आधारे शिक्षक निश्चिती केली जाते. ज्या शाळेत विद्यार्थी संख्या कमी होते तिथल्या अतिरिक्त शिक्षकांचे ,विद्यार्थ्यांच्या पटाच्या आवश्यकतेनुसार त्या शिक्षकांना बदली देवून समायोजन केले जाते. मराठी माध्यमाच्या २६. व उर्दू माध्यमाच्या ५ असे एकूण ३१ शिक्षकांचे या समायोजन प्रक्रियेचे रायगड जिल्हा परिषदेने शुक्रवारी जिल्हा परिषद कार्यालयात आयोजन केले होते पवित्र पोर्टर च्या माध्यमातून सन २०२४ मध्ये सेमी इंग्रजी असलेल्या १० शिक्षण सेवक यांना जिल्यातील उर्दू शाळांवर नेमणूक करण्यात आली आहे अश्या शिक्षकांना मराठी माध्यमाचा शाळांवर नियुक्ती देण्या संबंधित निर्णय घेतला आहे.यावेळी रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी.नेहा भोसले यांनी समायोजनाची माहीती दिली

## वाढदिवसानिमित्ताने विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत

**चौक : प्रतिनिधी**

अनंत अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त राजिप शाळा वडगाव येथे शालेय उपयोगी साहित्य वाटप करण्यात आल्याने विद्यार्थी,पालक, शिक्षक यांच्यात समाधान व्यक्त करण्यात आले.



रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, वडगाव येथे श्री.अनंतभाई अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय दफ्तर ,पाणी बॉटल,दोन जोडी कपडे देऊन साजरा करत त्यांना शुभेच्छा शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी विद्यार्थ्यांना त्यांच्या वन्यजीव प्रेम दर्शविणाऱ्या वनतारा या प्राणी संग्रहालायची चित्रफीत दाखवून त्यांच्या कार्याची ओळख देण्यात आली.तसेच त्यांच्या वाढदिवसाचा केक कापून विद्यार्थ्यांना वाटण्यात आला.तसेच सर्व आलेल्या अधिकाऱ्यांनी शालेय परिसर व शैक्षणिक उपक्रम वातावरणाचे तोंडभरून कौतुक केले.याप्रसंगी १ली ते ५ वी च्या ७९ विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी मा.गौरीताई महादेव गडगे, पंचायत समिती सदस्य गट वडगाव, खालापूर,मा.महादेवजी कमलाकर गडगे माजी सरपंच ग्रुप ग्रामपंचायत वडगाव,रिलायन्स उद्योग समूह चे HEAD HR & PMDPT मा. थॉमस साहेब,HEAD FC&APMD,HEAD CAD PMD मा.संतोष विचारे साहेब,HR Manager PMDPT मा.Ramdas Bhand, HR/IR Excutive मा.सागर ऐकेने साहेब,मा.मनमोहन अनंता गडगे पोलीस पाटील,मा.राजश्री नरेश जांभुळकर अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती, वडगाव,मा.करुणा रवींद्र ठोंबरे माजी अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती वडगाव,श्री.सुभाष राठोड मुख्याध्यापक राजिप उच्च प्राथमिक शाळा,वडगाव उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी विशेष अतिथी म्हणून मा.अनंतजी अंबानी यांचे कार्यलयीन विशेषाधिकार(OSD) मा.बर्मन साहेब उपस्थित होते.त्यांनी भविष्यातील शालेय विकासासाठी शक्य ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन यावेळी दिले.

शाळा फारच सुंदर असून शालेय वातावरण स्वच्छ व आनंददायी आहे.विशेष बाब म्हणजे मुख्याध्यापक फारच सहकार्य भावना ठेवून नम्रतेने सर्वांशी वागत होते.त्यांनी त्यांना झालेल्या कोणत्याही दुखापतीचा इथे कारण दिले नाही.संपूर्ण कार्यक्रम स्वतः लक्ष देऊन पार पाडला

# चेन्नईने उघडले विजयाचे खाते

## दिल्लीवर मात; संजू सॅमसनचे तडाखेबंद शतक

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्सने दिल्ली कॅपिटल्सचा २३ धावांनी पराभव केला. या हंगामातील दिल्लीचा हा सलग दुसरा पराभव होता, तर सलग तीन पराभवांनंतर चेन्नई सुपर किंग्सने आपला पहिला सामना जिंकला. या सामन्यात चेन्नईकडून संजू सॅमसनने तुफानी शतक ठोकले.



आयपीएलचा १८वा सामना चेन्नई येथील एमए चिदंबरम स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात खेळला गेला. चेन्नईनं दिलेलं २१३ धावांचं लक्ष्य गाठताना दिल्ली कॅपिटल्सचा संघ २० षटकांत १८९ धावांवर सर्वबाद झाला. २१३ धावांचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सकडून ट्रिस्टन स्टब्सनं सर्वाधिक ६० धावा केल्या. पथुम निस्सांकानंही ४१ धावांची शानदार खेळी केली, मात्र इतर कोणत्याही खेळाडूनं फलंदाजीत लक्षणीय योगदान दिलं नाही, ज्यामुळं दिल्लीला सलग दुसऱ्या पराभवाला सामोरं जावं लागलं. चेन्नई सुपर किंग्ससाठी जेमी ओव्हरटन सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्यानं चार बळी घेतले.

अंशुल कंबोजनंही तीन बळी घेतले, तर खलील अहमद, गुर्जपनीत सिंग आणि नूर अहमद यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. तत्पूर्वी एमए चिदंबरम स्टेडियमवर नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना सीएसकेनं निर्धारित २० षटकांत दोन गडी गमावून २१२ धावा केल्या. कर्णधार ऋतुराज गायकवाड आणि संजू सॅमसन यांनी ६.२ षटकांत ६२ धावांची भागीदारी करून संघाला भक्कम सुरुवात करून दिली.

संजू ५६ चेंडूंमध्ये ४ षटकार आणि १५ चौकारांसह ११५ धावांवर नाबाद राहिला, तर दुबे ३ चौकारांसह १० चेंडूंमध्ये २० धावांवर नाबाद राहिला. दिल्ली कॅपिटल्सला एकमेव यश कर्णधार अक्षर पटेलनं मिळवलं, ज्यानं ४ षटकांत ३९ धावा देऊन १ बळी घेतला.

# आशियाई बॅडमिंटन स्पर्धेत आयुष शेट्टी अंतिम फेरीत

**निंगबो : वृत्तसंस्था**

भारताच्या आयुष शेट्टीने अव्वल मानांकित आणि गतविजेता कुन्लावत वितिदसर्न याचा शनिवारी तीन गेममधील लढतीत पराभव करीत आशियाई बॅडमिंटन स्पर्धेची अंतिम फेरी गाठली.

विश्व क्रमवारीत २५व्या स्थानावर असलेल्या आयुषने पॅरिस ऑलिम्पिक रौप्य विजेता आणि २०२३ चा विश्वविजेता वितिदसर्न याच्यावर १०–२१, २१–१९, २१–१७ असा विजय मिळवला. तो दिनेश खन्ना यांच्यानंतर ६० वर्षांनी या स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत पोहोचणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला.

खन्ना यांनी १९६५ मध्ये पुरुष एकेरीचे सुवर्णपदक जिंकले होते. सात्त्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी २०२३ मध्ये दुहेरीचे विजेतेपद पटकावले होते. भारताचे माजी मुख्य प्रशिक्षक आणि 'सेंटर फॉर बॅडमिंटन एक्सिलन्स'चे संचालक विमल कुमार म्हणाले, 'आयुषने परिस्थिती अतिशय चांगल्या प्रकारे हाताळली. त्याच्या आक्रमक खेळामुळे वितिदसर्नवर मानसिक दबाव आला आणि त्याचा



आयुषने चतुराईने फायदा घेतला.'

वितिदसर्नने ४–० अशी आघाडी घेतल्यानंतर पहिला गेम सहज जिंकला. दुसऱ्या गेममध्ये आयुषने जोरदार पुनरागमन करीत वितिदसर्नकडून झालेल्या अनेक चुकांचा लाभ घेतला. बॅकहँड फ्लिकवर त्याने सहा गुण मिळवत दुसरा गेम जिंकला.

तिसऱ्या गेममध्ये २० वर्षांच्या आयुषने वितिदसर्नवर दबाव कायम ठेवताना १७–१० अशी आघाडी वाढविली. आक्रमक खेळाच्या जोरावर त्याने सलग मॅच पॉइंट मिळवून सामना जिंकला.

# चेंडू पाहतो, गोलंदाज नाही!

## आयपीएलमधील युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीचे प्रतिपादन

**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी आपल्या स्फोटक फलंदाजीनं चाहत्यांना मोहित करत आहे. हा १५ वर्षीय स्टार फलंदाज आतापर्यंत आयपीएल २०२६मध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. वैभवने ७ एप्रिल रोजी गुवाहाटीमध्ये मुंबई इंडियन्सचा स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीवर षटकार ठोकले होते आणि त्यानंतर त्यानं आरसीबीविरुद्धच्या सामन्यात जोश हेझलवूडला धुतलं आहे.

या दिग्गज गोलंदाजांविरुद्ध सूर्यवंशीच्या फलंदाजीनं सर्वांना आश्चर्यचकित केले आहे. वैभवनं यावर आपलं मौन सोडलं



आहे. आरसीबीविरुद्धच्या सामन्यानंतर बक्षीस वितरण समारंभात वैभव सूर्यवंशी दिसला. त्याला अव्वल गोलंदाजांविरुद्धच्या त्याच्या निर्भय फलंदाजीबद्दल विचारण्यात आलं. सूर्यवंशीने स्पष्ट केलं की तो फक्त चेंडू पाहतो, गोलंदाज नाही आणि म्हणूनच तो प्रत्येक गोलंदाजाविरुद्ध मोठे फटके मारु शकतो. तो म्हणाला, "मी फक्त चेंडू खेळण्याचा प्रयत्न करत होतो. मी गोलंदाजाकडे न पाहता चेंडूनुसार खेळतो." वैभव सूर्यवंशी सध्या आयपीएल २०२६मध्ये ऑरेंज कॅपचा मानकरी आहे. त्यानं आतापर्यंत ४ सामने खेळून एकूण २०० धावा केल्या आहेत.

आतापर्यंत त्यानं स्पर्धेत एकूण १८ चौकार आणि १८ षटकार मारले आहेत. सूर्यवंशीनं सीएसके आणि आरसीबीविरुद्ध अर्धशतक झळकावली, तर मुंबई इंडियन्सविरुद्ध त्यानं १४ चेंडूंमध्ये ३९ धावा केल्या.

# पंजाबची गाडी सुस्साट; हैदराबादला नमवले

**चंदिगड : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये पंजाब किंग्सची विजयी मालिका कायम आहे. पंजाबनं या हंगामातील आपल्या चौथ्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादचा सहा गडी राखून पराभव केला.

महाराजा यादवेंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर प्रथम फलंदाजी करताना हैदराबादनं सहा गडी गमावून २१९ धावा केल्या. प्रियांश आर्य, प्रभसिमरन सिंग आणि श्रेयस अय्यर यांनी पंजाबसाठी स्फोटक अर्धशतकं झळकावली आणि १९व्या षटकात सात चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला. पंजाब किंग्सचा चार सामन्यांतील हा तिसरा विजय आहे. त्यांचा एक सामना अनिर्णित राहिला, तर हैदराबादनं आपल्या चारपैकी



तीन सामने गमावले आहेत. विशेष म्हणजे पंजाब किंग्सनं आयपीएलमध्ये १०व्यांदा २००पेक्षा जास्त धावांचं लक्ष्य यशस्वीरित्या पूर्ण केलं आहे. अशा सहा यशस्वी पाठलागांसह मुंबई दुसऱ्या स्थानावर आहे. आयपीएलमध्ये २६२ धावांचं सर्वोच्च लक्ष्य गाठण्याचा विक्रमही पंजाब किंग्सच्या नावावर आहे.

२२० धावांचा पाठलाग करायला आल्यानंतर प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग या सलामीच्या जोडीनं पंजाबला स्फोटक सुरुवात करून दिली.

प्रियांशनं पहिल्याच चेंडूवर चौकार मारुन त्या षटकात १८ धावा केल्या. त्यानंतर पंजाबनं मागे वळून पाहिलं नाही. संघानं ६ षटकांत ९३ धावा जमवल्या. प्रियांशनं १६ चेंडूंमध्ये आपलं अर्धशतक पूर्ण केलं, पण त्यानंतर लगेचच शिवांग कुमारनं त्याला बाद केलं. प्रियांशनं २० चेंडूंमध्ये पाच चौकार आणि पाच षटकारांसह ५७ धावा केल्या. प्रभसिमरन सिंगनंही २५ चेंडूंमध्ये ५१ धावा करुन आपलं अर्धशतक पूर्ण केले. कूपर कॉनॉली १२ चेंडूंमध्ये केवळ ११ धावाच करु शकला. यानंतर कर्णधार श्रेयस अय्यरनं सूत्रं हाती घेतली.

नेहल वढेरानं अय्यरसोबत चौथ्या विकेटसाठी ३५ चेंडूंमध्ये ६९ धावा जोडून संघाला विजयाच्या जवळ आणलं. नेहलनं १४ धावांचं योगदान दिलं. त्यानंतर शशांक सिंगनं (१६ नाबाद) कर्णधाराला साथ दिली आणि सात चेंडू शिल्लक असताना संघाला विजय मिळवून दिला. श्रेयस ३३ चेंडूंमध्ये पाच षटकार आणि पाचच चौकारांसह ६९ धावांवर नाबाद राहिला. हैदराबादकडून शिवांग कुमारनं ३३ धावांत तीन बळी घेतले. तत्पूर्वी नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीला आल्यानंतर सनरायझर्स हैदराबादनं अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड यांच्या जोरावर धडाकेबाज सुरुवात केली. दोघांनी मिळून ८.१ षटकांत पहिल्या विकेटसाठी १२० धावा जोडल्या. अभिषेकनं स्फोटक फलंदाजी करत अवघ्या २८ चेंडूंमध्ये ७४ धावा केल्या. आपल्या खेळीत या डावखुऱ्या फलंदाजानं २६४च्या स्ट्राईक रेटनं पाच चौकार आणि आठ षटकार मारले. हेडनं २३ चेंडूंमध्ये ३८ धावांचं योगदान दिलं.

# तारिकच्या गोलंदाजीवर डॅरिल मिशेलचा आक्षेप

**कराची : वृत्तसंस्था**

पाकिस्तान सुपर लीगमध्ये सध्या एक नवा वाद उफाळून आला आहे. कराचीच्या नॅशनल स्टेडियमवर क्वेटा ग्लॅडिएटर्स आणि रावळपिंडीझ यांच्यात झालेल्या सामन्यात फिरकी गोलंदाज उस्मान तारिक याच्या गोलंदाजीच्या ॲक्शनवरून नाट्यमय घडामोडी पाहायला मिळाल्या. रावळपिंडीझचा फलंदाज डॅरिल मिशेल याने तारिकच्या गोलंदाजीचा सामना करण्यास चक्क नकार दिल्याने मैदानात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

उस्मान तारिक चेंडू टाकण्यापूर्वी जो काही क्षणांचा पॉज घेतो, त्यावरून हा सर्व वाद सुरू झाला. या पॉजमुळे डॅरिल मिशेल कमालीचा अस्वस्थ झाला. चेंडू नेमका कधी सुटणार याचा अंदाज येत नसल्याने मिशेलने अनेकदा क्रीझ सोडून बाजूला होत आपण खेळण्यास तयार नसल्याचे संकेत दिले. यामुळे खेळात व्यत्यय आला आणि अखेरीस पंचांना मध्यस्थी करावी लागली.

# दिग्गज गायिका आशा भोसलेंनी ब्रेट लीसोबत गायलं होतं गाणं!

## आयसीसी स्पर्धेदरम्यान झालं होतं प्रदर्शित

**मुंबई : प्रतिनिधी**

बॉलीवूडच्या दिग्गज गायिका आशा भोसले यांचं वयाच्या ९२व्या वर्षी निधन झालं आहे. आशा भोसले यांच्या निधनानं संपूर्ण देशाला धक्का बसला आहे. त्या त्यांच्या अष्टपैलू गायनासाठी ओळखल्या जात होत्या. त्यांनी हजारो गाणी गायली आणि आपल्या आवाजाच्या जादूनं लोकांना मंत्रमुग्ध केलं. आशा भोसले यांनी अनेक गायकांसोबत काम केलं. पण तुम्हाला माहित आहे का की त्यांनी आपल्या कारकिर्दीत १०३४ विकेट घेणाऱ्या एका क्रिकेटपटूसोबत एक हिंदी गाणंही गायलं होतं? हे सहकार्य ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू ब्रेट लीसोबत होते.





आशा भोसले यांनी ब्रेट लीसोबत गायलेलं गाणं : आशा भोसले आणि ब्रेट ली यांनी एकत्र "यू आर द वन फॉर मी" हे गाणं गायलं. हे गाणं हिंदीमध्ये असून ते ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू ब्रेट लीनं लिहिलं होतं. आशा भोसले आणि ब्रेट ली यांनी गायलेले हे गाणे आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २००६ दरम्यान प्रदर्शित झालं होतं.

आशा भोसलेंच्या नावावर गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड : आशा भोसले यांच्या नावावर अनेक विक्रम आहेत. त्यांच्या प्रतिभेच्या जोरावर, ग्रॅमी पुरस्कारासाठी नामांकन मिळवणारी त्या पहिल्या भारतीय महिला गायिका ठरल्या. २००५ मध्ये आशा यांना ग्रॅमी पुरस्कारासाठी नामांकन मिळालं होतं. इतकंच नाही, तर गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्येही त्यांची नोंद आहे. २०११ मध्ये, सर्वाधिक स्टुडिओ रेकॉर्डिंग केल्याबद्दल गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये त्यांची नोंद झाली. त्यांनी २० हून अधिक भारतीय भाषांमध्ये १२,००० हून अधिक गाणी गायली आहेत, ज्यामुळं त्यांना हा प्रतिष्ठित किताब मिळाला आहे.

१०३४ बळींपैकी आंतरराष्ट्रीय ७१८ विकेट : आशा भोसले यांच्यासोबत गाणं गाणारा ब्रेट ली हे एक यशस्वी क्रिकेटपटू आहेत. ब्रेट ली क्रिकेटच्या मैदानावर किती उत्कृष्ट खेळाडू होता हे सांगण्याची गरज नाही. त्याच्या कारकिर्दीतील १०३४ बळी याची साक्ष देतात. हे बळी प्रथम–श्रेणी क्रिकेट, लिस्ट ए क्रिकेट आणि टी–२० क्रिकेट मिळून घेतले होते. त्यानं प्रथम–श्रेणी क्रिकेटमध्ये ४८७, लिस्ट–ए क्रिकेटमध्ये ४३८ आणि टी–२० क्रिकेटमध्ये १०९ बळी घेतले. आशा भोसले यांच्यासोबत हिंदीत गाणी गाणाऱ्या ब्रेट लीनं आपल्या १०३४ बळींपैकी ७१८ बळी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये घेतले. त्यानं ७६ कसोटी सामन्यांमध्ये ३१०, २२१ वनडे सामन्यांमध्ये ३८० आणि २५ टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये २८ बळी घेतले.

सचिनसोबतही होतं घट्ट नातं : आशा भोसले यांचं सचिन तेंडुलकरसोबतही जवळचं नातं होतं. आशाताई सचिनला क्रिकेटचा सर्वश्रेष्ठ तारा म्हणत असत. आशा भोसले १९९२ आणि २०२३ च्या विश्वचषक स्पर्धांमध्ये सचिन तेंडुलकरसोबतही दिसल्या होत्या.

# आरडीसीए प्रीमियर लीगमध्ये फायनलची रंगत



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पुरुषांच्या खुल्या गटाच्या टी–ट्वेन्टी प्रीमियर लिग क्रिकेट स्पर्धाचा अंतिम सामना पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर पेण बाप्पा विरुद्ध समीरा हॅबिटेटेस अलिबाग जेट्स ह्या दोन संघांमध्ये खेळवला जातोय.

शनिवारी झालेल्या प्ले ऑफ फॉरमॅट मधील उपांत्य फेरीच्या सामन्यात, पेण बाप्पा संघाने दमदार कामगिरी करत अंतिम सामन्यासाठी आपला प्रवेश निश्चित केला आहे. उपांत्य फेरीच्या सामन्यात पेण बाप्पा संघाने टीआयपीए पनवेल किंग्स संघावर २७ धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करतांना पेण बाप्पा संघाने निर्धारित वीस षटकांमध्ये ३ गडी गमावत १९० धावसंख्या उभारली त्यामध्ये भावेश पाटील यांनी चौफेर फटकेबाजी करत सर्वाधिक ५५ धावा काढल्या तर जपजित सिंह ४५,विनय ठाकूर नाबाद ३३, योगेश पवार यांनी नाबाद ३४ धावा काढून संघाला मोठी धावसंख्य उभारण्यात योगदान दिले. टीआयपीए पनवेल किंग्स संघाकडून संकेत रानडे यांनी २ अमेय भोसले यांनी १ फलंदाज बाद केला.१९१ धावांचा पाठलाग करतांना पनवेल संघानी २० षटकांमध्ये ९ गडी गमावत १६३ धावा फलकावर नोंदवल्या त्यामध्ये सिद्धार्थ म्हात्रे यांनी सर्वाधिक ५९,रवी सोलंकी यांनी ३३ धावा काढून कडवी झुंज दिली.पेण बाप्पा संघाकडून अष्टपैलू खेळाडू शेखर भगत यांनी टिचून गोलंदाजी करत पनवेल संघाचे ६ फलंदाज बाद करत संघाला विजय मिळवून दिला.

शेखर भगत यांना सामनावीर म्हणून रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक, सहसचिव जयंत नाईक, खजिनदार प्रशांत ओक यांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचा अंतिम सामना पेण बाप्पा विरुद्ध समीरा हॅबिटेटेस अलिबाग जेट्स ह्या दोन संघांमध्ये रंगणार आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com